# MAHARASHTRA ACT, No. XLI OF 1983

## THE MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES (KRISHI VIDYAPEETHS) ACT, 1983.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २२ ऑग. १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आहे.

एस. ए. धोले,
सचिव,
महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभ

# MAHARASHTRA ACT, No. XLI OF 1983

AN ACT

*to consolidate and amend the law relating to the four Agricultural Universities in Maharashtra.*

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २४ ऑगस्ट १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.

महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठांशी संबंधित कायद्यांचे एकत्रीकरण व सुधारणा यांसाठी अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील चार कृषि विद्यापीठांशी संबंधित कायद्यांचे एकत्रीकरण व सुधारणा करणे इष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठांचे अधिक चांगल्या रीतीने नियमन करण्यासाठी आणि त्या विद्यापीठातील अधिक कार्यक्षम प्रशासनासाठी व वित्तीय नियंत्रणासाठी आणि अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण अधिक चांगल्या पद्धतीने संघटित करण्यासाठी एक सामायिक कायदा करण्याचे आता ठरविण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोल्लिखित निर्णयानुसार कृषि व तदनुषंगिक बाबी यांतील शिक्षणाकरिता अधिक चांगल्या सुविधांची तरतूद करण्यासाठी व विशेषत: कृषिशास्त्रांच्या विकासासाठी आणि राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल असे कृषि विकास कार्यक्रम आणि विस्तार शिक्षण आणि शासनाची इतर कामे यांना सहाय्य करणे व पाठिंबा देणे याकरिता तशा योजना पार पाडण्यासाठी किंवा उपक्रम हाती घेण्यासाठी आणि पूर्वोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्रातील चार विद्यापीठांची पुनर्रचना करणे आता इष्ट वाटत आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण १

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात—

(अ) "संलग्न महाविद्यालय" म्हणजे, विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या व्यवस्थापनाखाली असलेले व विद्यापीठास संलग्न असलेले किंवा संलग्न असल्याचे मानण्यात येणारे महाविद्यालय;

(ब) "कृषि" या संज्ञेत, मृद व जल व्यवस्थापन, पीक संवर्धन (रोपांवरील कीड व रोग यांच्या नियंत्रणासह), फलोत्पादन, कृषि अभियांत्रिकी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, पशुवैद्यकशास्त्र, मत्स्यव्यवसाय, सागरी जीवशास्त्र, वनशास्त्र आणि तसेच गृहशास्त्र, सहकार व कृषीसंबंधीची खरेदी-विक्री यासंबंधीची (तंत्रशास्त्र धरून) मूल व उपयोजित विज्ञाने यांचा समावेश होतो;

(क) "घटक महाविद्यालय" म्हणजे, विद्यापीठाच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनाखाली असलेले महाविद्यालय—मग ते मुख्यालयाच्या ठिकाणी असो किंवा विद्यापीठ अधिक्षेत्रात इतरत्र असो;

(ड) विद्यमान विद्यापीठाच्या संबंधात "तत्सम विद्यापीठ" म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये अशा विद्यमान विद्यापीठासमोर विनिर्दिष्ट केलेला निगमनिकाय;

(ई) "विभाग" म्हणजे, एखाद्या विषयाच्या किंवा एखाद्या विषयगटाच्या संदर्भात परिनियमांद्वारे तसे नामाभिधान दिलेला विभाग;

(फ) "विद्यमान विद्यापीठ" म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले विद्यापीठ;

(ग) "विस्तार शिक्षण" म्हणजे, शेतकरी, गृहनिर्वाहक व शेतीची मशागत करणारे इतर गट यांना सुधारलेल्या शेती पद्धती आणि शेती व शेतीचे उत्पादन व खरेदी-विक्री यासंबंधीच्या शास्त्रीय तंत्रशास्त्राच्या विविध अवस्था यातील प्रशिक्षण देण्यासंबंधीची शैक्षणिक कामे. त्यांमध्ये सभा, प्रात्यक्षिके, सुधारित शेती शिकविण्यासाठीच्या इतर पद्धती यांद्वारे करण्यात येईल अशा कामाचा व ही शैक्षणिक कामे करण्यासाठी आवश्यक असलेले कामगारांचे प्रशिक्षण यांचा समावेश होईल;

(ह) "विभाग प्रमुख" म्हणजे, विभागातील अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांसाठी मुख्यत: जबाबदार असणारी, विद्याविषयक कर्मचारीवर्गातील व्यक्ती;

(आय) "इतर मागासवर्ग" म्हणजे राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी इतर मागासवर्गातील असल्याचे घोषित करण्यात आल्या असतील अशा किंवा यानंतर अशा वर्गातील म्हणून घोषित करण्यात येतील अशा जाती ;

(ज) "विहित केलेले" म्हणजे, परिनियमांद्वारे विहित केलेले;

(के) "प्राचार्य" म्हणजे, महाविद्यालय, स्नातकोत्तर केंद्र किंवा इतर मान्यताप्राप्त परिसंस्था यांचा प्रमुख;

(ल) "मान्यताप्राप्त परिसंस्था" म्हणजे, संलग्न किंवा घटक महाविद्यालयांव्यतिरिक्त, संशोधन किंवा विशेष अभ्यास यांसाठी असलेली व विद्यापीठाने अशी संस्था म्हणून मान्यता दिलेली किंवा मान्यता देण्यात आल्याचे मानण्यात येणारी परिसंस्था आणि त्यामध्ये शेतकरी शाळा किंवा ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रासारखी निम्नकृषी शिक्षणासाठी असणारी व विद्यापीठाच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनाखाली असणारी किंवा विद्यापीठाने तशी मान्यता दिलेली किंवा मान्यता असल्याचे मानण्यात येणारी कोणतीही संस्था याचा समावेश होतो;

(म) "नियम" म्हणजे राज्य शासनाने या अधिनियमाखाली केलेले नियम;

(न) "अनुसूची" म्हणजे या अधिनियमाची अनुसूची;

(ओ) "अनुसूचित जाती" म्हणजे, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येणाऱ्या जाती, वंश किंवा जनजाती अथवा अशा जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा त्यातील गट आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यात नवबौद्धांचा समावेश होतो;

(पी) "अनुसूचित जमाती" म्हणजे, महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या व भारतीय संविधानाचा अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जनजाती म्हणून समजण्यात येणाऱ्या जनजाती किंवा जनजाती समाज अथवा जनजाती किंवा जनजाती समाज यांचे भाग किंवा त्यातील गट आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यामध्ये निरधिसूचित (Denotified) व भटक्या जमाती यांचा समावेश होतो;

(क्यू) "राज्य परिषद" म्हणजे या अधिनियमाखाली रचना करण्यात आलेली महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद;

(र) "परिनियम" व "विनियम" म्हणजे, या अधिनियमान्वये केलेले किंवा करण्यात आल्याचे समजण्यात येणारे विद्यापीठाचे अनुक्रमे परिनियम व विनियम;

(एस) "विद्यापीठ" म्हणजे, या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेले विद्यापीठ;

(ट) अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विद्यापीठाच्या संबंधात, "विद्यापीठ अधिक्षेत्र" म्हणजे, अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्यासमोर विनिर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र;

(यू) विद्यापीठाच्या संबंधात "विद्यापीठ क्षेत्र" म्हणजे, ज्याची या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी विद्यमान विद्यापीठाचे विद्यापीठ क्षेत्र म्हणून व्याख्या करण्यात आली होती असे किंवा राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी, विद्यापीठ क्षेत्र म्हणून व्याख्या करण्यात येईल असे विद्यापीठाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेले विद्यापीठाचे क्षेत्र.

(ए-१) "न्यायाधिकरण" याचा अर्थ, कलम ६८अ अन्वये स्थापन करण्यात आलेले कृषि विद्यापीठ आणि महाविद्यालय न्यायाधिकरण, असा होतो.

प्रकरण २

## विद्यापीठे

३. (१) (अ) अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक विद्यमान विद्यापीठाच्या बाबतीत, या अधिनियमाच्या प्रारंभापासून, त्या अनसूचीच्या स्तंभ (२) मध्ये, त्या त्या विद्यापीठाच्या नावासमोर नमूद केलेले संबंधित विद्यापीठ, हे या अधिनियमान्वय याद्वारे, त्याच नावाने स्थापन करण्यात येत आहे.

(ब) अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक विद्यापीठाचे कुलपती, प्रति कुलपती, कुलगुरू, विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे व विद्या परिषदेचे पहिले सदस्य आणि ज्या व्यक्ती, त्या त्या विद्यापीठाचे कार्यकारी अधिकारी किंवा सदस्य म्हणून निवडण्यात, नामनिर्दिष्ट करण्यात नेमण्यात आल्याचे किंवा स्वीकृत करण्यात आल्याचे मानण्यात येत असतील; किंवा यानंतर नामनिर्दिष्ट केल्या जातील किंवा नेमण्यात येतील किंवा निवडल्या वा स्वीकृत केल्या जातील अशा सर्व व्यक्ती यांची, अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नावाने, निगम-निकाय म्हणून रचना करण्यात येत आहे आणि त्याची परंपरा अखंड असेल व त्याचा सामाईक शिक्का असेल आणि त्या नावाने त्यांना व त्याच्यांवर दावा लावता येईल.

(क) अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये प्रत्येक विद्यापीठाच्या नावासमोर विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे विद्यापीठ क्षेत्र असेल व अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी विद्यापीठाचे मुख्यालय असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही वेळी, राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विद्यापीठाचे मुख्यालय हे अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये त्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी असेल, असा निदेश देता येईल.

(३) प्रत्येक विद्यापीठ, जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन व धारण करण्यास, विद्यापीठाच्या प्रयोजनांसाठी त्यांच्याकडे निहित असेल किंवा त्याच्याकडून संपादन करण्यात येईल अशी कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता पट्टयाने देण्यास, विकण्यास किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यास किंवा तिची विल्हेवाट लावण्यास व, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा इतर सर्व गोष्टी करण्यास सक्षम असेल:

परंतु, स्थावर मालमत्ता अशा रीतीने पट्टयाने देणे, तिची विक्री करणे किंवा ती हस्तांतरित करणे या गोष्टी राज्य शासनाच्या पूर्वसंमतीशिवाय केल्या जाणार नाहीत.

(४) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास संपूर्ण राज्याच्या हितसंबंधाचा विचार करून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विद्यापीठ क्षेत्रातील कोणताही विशेषीकृत संशोधन कार्यक्रम अशा विद्यापीठ क्षेत्रामध्ये असा कार्यक्रम चालवण्यात येत नसला किंवा असला तरीही अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीसाठी व अशा अटी व शर्ती यांस अधीन राहून अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही अन्य विद्यापीठाकडे सोपवता येईल.

**विद्यापीठाचे उद्देश व शिक्षणाचे आणि परीक्षेचे माध्यम.**

४. (१) प्रत्येक विद्यापीठ पुढील प्रयोजनांसाठी प्रस्थापित व निर्गमित करण्यात आल्याचे मानण्यात येईल:—

(एक) कृषि व संलग्न विज्ञाने आणि मानवविज्ञान यांच्या शिक्षणासाठी तरतूद करणे;

(दोन) कृषि व संलग्न विज्ञाने यांतील शिक्षण व संशोधन यांच्या प्रगतीस चालना देणे;

(तीन) राज्यामधील शेती व शेतकरी यांच्या दर्जामध्ये सुधारणा व विकास घडवून आणण्यासाठी कृषि विज्ञान केंद्रे स्थापन करणे व जिल्हा स्तरावर शेतकऱ्यांचे वेळोवेळी मेळावे भरवणे यांसह विस्तार शिक्षणाचे कार्यक्रम हाती घेणे व त्यास मार्गदर्शन करणे;

(चार) विद्यापीठाच्या निरनिराळ्या विद्याशाखांतील विषयांच्या अध्यापनाचे एकात्मीकरण व समन्वयन करणे;

(पाच) कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणविषयक कामे यांत समन्वय साधणे;

(सहा) विद्यापीठास योग्य वाटेल अशा रीतीने विद्यार्थ्यांना शिकविणे व त्यांची परीक्षा घेणे आणि विद्यापीठास योग्य वाटतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी प्रदान करणे;

(सात) जास्तीत जास्त परिणामक्षमतेसाठी व कमीत कमी खर्चात सर्व स्तरांवर एकात्मीकृत कृषि शिक्षण कार्याची तरतूद करणे;

(आठ) या अधिनियमाच्या पूर्ववर्ती उपबंधांशी विसंगत नसतील अशी जी प्रयोजने राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, यांबाबत विनिर्दिष्ट करील अशी इतर प्रयोजने.

(२) विद्यापीठ, शिक्षणाचे व परीक्षेचे माध्यम म्हणून मराठीचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करील :

परंतु, परिनियमाद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा विषयांसाठी आणि अशा कालावधीसाठी किंवा कालावधींसाठी इंग्रजी हे शिक्षणाचे व परीक्षेचे माध्यम असेल.

विद्यापीठात प्रवेश व विवक्षित वर्गांस सवलती देणे.

५. ज्या व्यक्तींनी विद्यापीठात ज्या तारखेपासून प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या १० वर्षे मुदतीमध्ये तीन वर्षांहून कमी नसेल इतक्या मुदतीत ज्यांनी किंवा ज्यांच्या आईवडिलांनी महाराष्ट्र राज्यात निवास केला असेल अशा सर्व व्यक्तींना प्रत्येक विद्यापीठ खुले असेल आणि धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली याच केवळ कारणावरून कोणत्याही व्यक्तीस, कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी किंवा अभ्यासक्रम यामध्ये प्रवेश देताना वगळण्यात येणार नाही :

परंतु, विद्यापीठास, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीस अधीन राहून, विद्यापीठाने चालविलेल्या किंवा त्याचे नियंत्रण असलेल्या कोणत्याही महाविद्यालयात किंवा संस्थेत, विद्यार्थी म्हणून प्रवेश मिळविण्याच्या प्रयोजनाकरिता पुढील वर्गातील व्यक्तींसाठी विवक्षित जागा राखून ठेवता येतील :—

(एक) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती;

(दोन) इतर मागास वर्ग;

(तीन) शेतकरी व विहित किमान अर्हता असलेली किंवा कृषिविषयक अनुभव असलेली शेतकऱ्यांची मुले;

(चार) ज्या तारखेला प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या व्यक्तींनी व ज्यांच्या आईवडिलांनी या राज्यात निवास केलेला नसेल अशा व्यक्ती;

(पाच) स्वातंत्र्य सैनिकांची मुले;

१९७६ चा महा. ४१.

(सहा) महाराष्ट्र प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची पुनर्वसाहत अधिनियम, १९७६ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणेच्या विस्थापित व्यक्ती व त्यांची मुले; *(सात) संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांची मुले; (आठ) विद्यापीठ [illegible] संस्थेमधून अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण होणार विद्यार्थी.

आणखी असे की विद्यापीठास, तशाच मंजुरीस अधीन राहून, लगत पूर्वीच्या परंतुकातील (एक), (दोन), (तीन), (पाच) व (सहा) या सर्व किंवा कोणत्याही प्रवर्गाखाली येणाऱ्या व्यक्तींना, विद्यापीठास योग्य वाटेल अशी फी किंवा जेवणाचा, राहण्याचा किंवा इतर खर्च किंवा सर्व फी व आकार यांची माफी देता येईल किंवा विद्यापीठास योग्य वाटेल अशा विशेष शिष्यवृत्यांची त्यांच्यासाठी तरतूद करता येईल :

विद्यापीठाचे उद्देश व शिक्षणाचे आणि परीक्षेचे माध्यम.

तसेच **

त्याचप्रमाणे, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, प्रवेशासाठी विहित विद्याविषयक अर्हता नसणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा अभ्यासक्रमास प्रवेश देणे किंवा पदवी बहाल करण्यासाठी आवश्यक किमान अर्हतेपेक्षा कमी शैक्षणिक प्रगती असणाऱ्या व्यक्तींना किंवा विद्यापीठाच्या प्रयोजनांना किंवा इतर विद्यार्थ्यांच्या व विद्याविषयक कर्मचारी वर्गाच्या हक्कांना व विशेष हक्कांना बाधिक ठरेल अशी वर्तणूक असणाऱ्या व्यक्तींना, विद्यापीठाच्या हजेरीपटावर ठेवणे विद्यापीठास आवश्यक असणार नाही.

तसेच, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, विहित केलेल्या संख्येहून अधिक विद्यार्थ्यांना किंवा विहित केलेल्या अर्हतेपेक्षा कमी असेल अशी विद्याविषयक किंवा इतर अर्हता असलेल्या विद्यार्थ्यांना, कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश देणे विद्यापीठास आवश्यक असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमाच्या प्रयोजनांसाठी "शेतकरी" म्हणजे जी व्यक्ती, मालक किंवा कूळ म्हणून, शेत जमीन धारण करीत असेल व जिचे मुख्य उत्पन्न, जमिनीच्या वैयक्तिक मशागतीपासून मिळत असेल अशी व्यक्ती आणि त्या संज्ञेत, जिच्या उपजीविकेचे मुख्य साधन शेतजमिनीवरील शारीरिक श्रम हे असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.

* १९८८ [illegible] कलम २(ग) [illegible] (सात) आणि (आठ) नव्याने दाखल करण्यात आले.
** १९८८ चा १२ च्या कलम २(ब) अन्वये मजकूर [illegible] करण्यात आला.

विद्यापीठाचे अधिकार व कामे.

६. या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, प्रत्येक विद्यापीठास पुढील अधिकार असतील व ते पुढील कामे पार पाडील :—

(एक) कृषि व संलग्न विज्ञाने आणि विद्यापीठास योग्य वाटेल अशा विद्येच्या इतर शाखा यांतील शिक्षणाची तरतूद करणे ;

(दोन) संशोधन करण्यासाठी आणि संशोधनाचे निष्कर्ष व तांत्रिक माहिती यांचा विस्तार शिक्षण कार्यक्रमाद्वारे प्रसार करण्यासाठी तरतूद करणे;

(तीन) अभ्यासक्रम सुरू करणे आणि पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी यांसाठी परीक्षा घेणे व ज्यांनी—

(अ) विहित केलेला अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, किंवा

(ब) विहित करण्यात येईल असे संशोधन, विद्यापीठात किंवा याबाबतीत विद्यापीठाने मान्यता दिलेल्या एखाद्या संस्थेत पार पाडले असेल अशा व्यक्तींसाठी—

(चार) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी चालू करणे;

(पाच) विहित करण्यात येतील अशा सन्मान्य पदव्या व इतर विशेषोपाधी प्रदान करणे;

(सहा) विद्यापीठाचे नियमित विद्यार्थी म्हणून ज्याची नावे पटावर दाखल करण्यात आली नसतील असे क्षेत्र कार्यकर्ते, शेतकरी व इतर व्यक्ती यांच्यासाठी व्याख्याने व शिक्षण यांची तरतूद करणे आणि विहित करण्यात येतील अशी प्रमाणपत्रे त्यांना देणे;

(सात) अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांसाठी प्रयोगशाळा, ग्रंथालये, संशोधन केंद्रे, संस्था, प्रात्याक्षिक केंद्रे, वस्तू संग्रहालये व मत्स्यालये स्थापन करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे आणि विद्यापीठाचे विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी योग्य वाटतील अशा इतर सोयींची तरतूद करण;

(आठ) कृषि व उपयोजित विज्ञाने यासंबंधीची महाविद्यालये, शाळा, केंद्रे, गृहविज्ञान शाखा, कर्मशाळा शाखा व इतर संस्था व त्यांची वसतिगृहे सुरू करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे;

(नऊ) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या निवास, वर्तणूक व शिस्त यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे आरोग्य व कल्याण यांचे संवर्धन करण्यासाठी व्यवस्था करणे;

(दहा) विद्यापीठास आवश्यक असतील अशी अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यासंबंधातील पदे सुरू करणे व अशा पदांवर व्यक्तींच्या नियुक्त्या करणे;

(अकरा) प्रशासकीय, लिपिक वर्गीय व इतर पदे निर्माण करणे व अशा पदांवर व्यक्तींच्या नियुक्त्या करणे;

★ राज्य शासनाच्या पूर्व-मान्यतेने प्रशासनिक, लिपिक-वर्गीय आणि इतर पदे निर्माण करणे आणि अशा पदांवर विहित पद्धतीने व्यक्तींची नेमणूक करणे;

(बारा) परिनियमांनुसार अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या व पारितोषिके चालू करणे व ती देणे;

(तेरा) विहित करण्यात येईल अशी फी व इतर आकार निश्चित करणे, त्यांची मागणी करणे व ती स्वीकारणे;

(चौदा) विद्यापीठ ठरवील अशा रीतीने व अशा प्रयोजनांसाठी इतर विद्यापीठांशी व शासकीय विभागांशी सहकार्य करणे;

(पंधरा) विद्यापीठाच्या व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या महाविद्यालयांच्या व संस्थांच्या विद्यार्थ्यांच्या व कर्मचारीवर्गाच्या गरजा भागविण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांची तरतूद करणे ;

(सोळा) विद्यापीठाच्या उद्देशांच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक असतील अशा सर्व कृती व गोष्टी—मग ती अधिकार व कामे यांच्याशी आनुषंगिक असोत वा नसोत—करणे.

शासनाच्या कृषि विकास कार्यक्रमांना मदत करण्या-संबंधात विद्यापीठाची कर्तव्ये.

७. संकरित व मूळ बियाण्यांचे उत्पादन करणे अशा शेतमालाच्या उत्पादनखर्चाचा अंदाज काढण्यासाठी सर्वेक्षण करणे अशा प्रशिक्षणात सहभागी होणे व अशा विस्तार (शिक्षण) पद्धतीस भेटी देणे आणि शासनाचे कृषि विकास कार्यक्रम किंवा कामे यांना मदत व पाठिंबा म्हणून, कुलपतीला कळवून, प्रति-कुलपती वेळोवेळी निर्देश देईल अशा, इतर योजना किंवा कामे, निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत पार पाडणे किंवा ती हाती घेणे हे प्रत्येक विद्यापीठाचे कर्तव्य असेल.

★ २००३ च्या १४ च्या कलम ३ च्या (ऊ) अन्वये मूळ (अकरा) ऐवजी नवीन (अकरा) खंड समाविष्ट करण्यात आला.

(१२२)

**कलम ७ खालील निदेशांचे पालन करण्यात कसूर केल्यास, विद्यापीठाकडे निहित असलेल्या जमिनी परत घेण्याचा अधिकार.**

८. कलम ७ अन्वये काढलेल्या निदेशांनुसार, विद्यापीठ हे त्याच्याकडे निहित असलेल्या जमिनीवर पुरेसे कृषि उत्पादन काढीत नाही असे राज्य शासनाचे मत होईल तर राज्य शासनास, विद्यापीठाला, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे त्याच्याकडे निहित असलेल्या जमिनी राज्य शासनाने परत का घेऊ नयेत याची कारणे, विनिर्दिष्ट मुदतीत दाखविण्यास, नोटिशीद्वारे फर्माविता येईल. विद्यापीठाने दाखवलेल्या कारणांचा असल्यास विचार केल्यानंतर, राज्य, शासनास या अधिनियमान्वये करता येईल अशा कोणत्याही अन्य कार्यवाहीस बाध न येऊ देता, नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही जमिनी, आदेशाद्वारे, विद्यापीठाकडून आपल्याकडे परत घेता येतील आणि एकतर स्वत: किंवा याबाबतीत त्याने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही एजन्सीमार्फत तिच्या विकासाचे कार्यक्रम किंवा तीवरील कामे हाती घेता येतील.

**इतर कृषितर विद्यापीठांनी कृषीशास्त्र, पशुवैद्यक शास्त्र व मत्स्यसंवर्धन शास्त्र यातील पदवी इ. देण्यास मनाई**

९. राज्यामध्ये कोणतेही कृषितर विद्यापीठ स्थापना करण्याशी संबंधित कोणत्याही अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, असे कोणतेही विद्यापीठ, कृषी शास्त्र, पशुवैद्यक शास्त्र आणि मत्स्यसंवर्धन शास्त्र यातील कोणतीही पदविका, प्रमाणपत्र किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी देण्यास सक्षम असणार नाही.

☆ परंतु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम १९८९ याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास किंवा त्या अधिनियमाच्या कलम ५ पोट-कलम (१), खंड (तेवीस) अन्वये त्या विद्यापीठाकडून मान्यता देण्यात आलेल्या कोणत्याही उच्च शिक्षण संस्थांना किंवा अभ्यास संस्थांना हे कलम किंवा कलम ४० मधील यातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही आणि ते विद्यापीठ कृषिशास्त्र, पशुवैद्यकशास्त्र आणि मत्स्यसंवर्धनशास्त्र या विषयांतील कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विशेषोपाधी देण्यास सक्षम असेल.

**विवक्षित परिसंस्थांचे शासनाकडे हस्तांतरण.**

१०. जर कोणत्याही विद्यापीठाच्या मते, त्याच्याकडे हस्तांतरित अथवा निहित करण्यात आलेले कोणतेही महाविद्यालय, संशोधन परिसंस्था, शाळा, केंद्र, कार्य अथवा इतर परिसंस्था, ही त्याच्या गरजेपेक्षा अधिक असेल तर विद्यापीठाला, ती राज्य शासनाने स्वत:कडे घ्यावी अशी राज्य शासनाला विनंती करता येईल. अशी विनंती करण्यात आल्यावर, राज्य शासनाला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निदेश देता येईल की, अशी परिसंस्था, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून आणि (तीत अथवा तिच्या अधीन सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांशी संबंधित असतील अशा अटी व शर्ती धरून) अशा अटींवर व शर्तींवर, विद्यापीठाकडे निहित असण्याचे बंद होईल आणि ती राज्य शासनाकडे जाईल आणि राज्य शासनाकडून चालविण्यात येईल; आणि त्यानंतर अशा परिसंस्थेच्या संबंधातील विद्यापीठाची सर्व मालमत्ता व मत्ता आणि दायित्वे, राज्य शासनाकडे हस्तांतरित आणि निहित होतील. परिसंस्थेबरोबरच राज्य शासनाकडे हस्तांतरित केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्ती, कोणत्याही असल्यास, या अशा हस्तांतरणाच्या लगतपूर्वी त्यांना लागू असतील अशा सेवा शर्तींपेक्षा कमी अनुकूल असणार नाहीत.

**तपासणी व चौकशी.**

११. (१) कुलपतीस, तो निदेश देईल अशा एक वा अनेक व्यक्तीकडून किंवा मंडळीकडून कोणतेही विद्यापीठ, तिच्या इमारती, कृषिक्षेत्रे, प्रयोगशाळा, ग्रंथालये, कार्यशाळा यांची व विद्यापीठाने चालविलेले त्याच्या व्यवस्थेखाली असलेले किंवा त्याने मान्यता दिलेले कोणतेही महाविद्यालय, परिसंस्था किंवा वसतीगृह यांची साधनसामग्री व विद्यापीठाकडून किंवा त्याच्यावतीने किंवा त्याच्या विद्यमाने चालविण्यात येणारी अध्यापनाची किंवा इतर कामे यांची आणि परीक्षा संचालन किंवा विद्यापीठाची इतर कामे यांच्या तपासणीची व्यवस्था करण्याचा अधिकार असेल आणि विद्यापीठाच्या प्रशासनाशी किंवा अर्थव्यवस्थेशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी तशाच रीतीने चौकशी करण्याचा अधिकार असेल.

☆ सन १९८९ चा (४) याच्या कलम ३ अन्वये कलम ९ नंतर खालील परंतुक दाखल

(२) कुलपती प्रत्येक प्रकरणी, अशी तपासणी किंवा चौकशी करवून घेण्याच्या आपल्या हेतुबद्दलची यथोचित नोटीस विद्यापीठास देईल आणि विद्यापीठास प्रतिनिधी नियुक्त करण्याचा हक्क असेल. उक्त प्रतिनिधीस अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी, उपस्थित राहण्याचा व आपली बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(३) अशा तपासणी किंवा चौकशी करवून घेण्यात आल्यानंतर, कुलपती, अशा तपासणीचे किंवा चौकशीचे निष्कर्ष कुलगुरूस लेखी कळवू शकेल आणि कुलगुरू, कार्यकारी परिषदेस, कुलपतीचे त्यावरील मत कळवील आणि कुलपतीने विनिर्दिष्ट केली असेल अशा कालमर्यादेत, आपले मत त्याच्यामार्फत, कुलपतीस कळविण्यासाठी कार्यकारी परिषदेस फर्मावील. कार्यकारी परिषदेने, विनिर्दिष्ट कालमर्यादेत, आपले मत कळविल्यास ते मत विचारात घेतल्यानंतर किंवा कार्यकारी परिषदेने विनिर्दिष्ट कालमर्यादेत आपले मत कळविण्यास कसूर केल्यास, ती कमालमर्यादा संपल्यानंतर, कुलपतीला पुढील कार्यवाही म्हणून कार्यकारी परिषदेन करावयाच्या कारवाईबाबत तिला सल्ला देता येईल आणि अशी कारवाई करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करता येईल.

(४) कार्यकारी परिषद, अशा रीतीने निश्चित केलेल्या मुदतीच्या आत, कुलपतीने दिलेल्या सल्ल्यानुसार जी कारवाई करण्यात आली असेल किंवा करावयाचे योजिले असेल त्याबद्दल, कुलगुरूमार्फत, कुलपतीस कळवील.

(५) कुलपतीस, निश्चित केलेल्या मुदतीच्या आत, त्याचे समाधान होईल अशारीतीने, कार्यकारी परिषदेकडून कारवाई करण्यात आली नसेल त्याबाबतीत, आणि कार्यकारी परिषदेने सादर केलेले स्पष्टीकरण किंवा दिलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, निदेश देता येतील आणि कार्यकारी परिषद व इतर संबंधित प्राधिकारी अशा निदेशांचे पालन करतील.

(६) निकटपूर्वीच्या पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही बाबीच्या संबंधात विद्यापीठाचे कामकाज हे विद्यापीठाच्या उद्देशांच्या पुष्टयर्थ किंवा हा अधिनियम आणि परिनियम आणि विनियम यांच्या उपबंधानुसार चालविण्यात येत नाही किंवा विद्यापीठाचे अध्यापन, परीक्षा, संशोधन विस्तार शिक्षण, प्रशासन अथवा वित्त व्यवस्था यांचा दर्जा कायम ठेवण्यासाठी विशेष उपाय योजने इष्ट आहे असे कुलपतीचे कोणत्याही वेळी मत होईल तर त्यास, ज्या बाबीसंबंधातील स्पष्टीकरण आवश्यक असेल ती बाब, कुलगुरूमार्फत, कार्यकारी परिषदेस सूचित करता येईल आणि ती विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या आत असे स्पष्टीकरण देण्याबद्दल, कार्यकारी परिषदेस फर्मावता येईल. विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीच्या आत, कोणतेही स्पष्टीकरण देण्यात, कार्यकारी परिषद कसूर करील किंवा कुलपतीच्या मते समाधानकारक नसेल असे स्पष्टीकरण कार्यकारी परिषद देईल तर, कुलपतीस, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील आणि कार्यकारी परिषद व इतर संबंधित प्राधिकारी अशा निदेशांचे पालन करतील.

(७) कार्यकारी परिषद, कुलपती वेळोवेळी फर्मावील त्याप्रमाणे, विद्यापीठाचे प्रशासन व अर्थव्यवस्था यासंबंधीची माहिती पुरवील.

(८) कार्यकारी परिषद, राज्य शासन वेळोवेळी फर्मावील त्याप्रमाणे, विद्यापीठाची मालमत्ता किंवा त्याचे कामकाज यासंबंधातील विवरण किंवा इतर माहिती राज्य शासनास देईल.

## प्रकरण ३

### महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद

राज्य परिषदेची रचना व तिचे अधिकार व कामे.

१२. (१) राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांच्या कार्यामध्ये, विशेषत: शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण व समान हितसंबंध असलेल्या इतर बाबी यांच्याशी संबंधित कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणण्यासाठी आणि विद्यापीठाच्या कार्याचे नियतकालिक मूल्यमापन करण्यासाठी आणि विद्यापीठे आणि त्यांची शैक्षणिक कार्ये व वित्तीय व्यवहार यांवर देखरेख ठेवण्यासाठी, राज्य शासन, "महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद" या नावाची एक परिषद स्थापन करील.

(२) (अ) महाराष्ट्र राज्याचे कृषि मंत्री हे या राज्य परिषदेचे अध्यक्ष असतील.

(ब) राज्य शासनाला, त्याच्या मते, कृषि विकासाच्या कोणत्याही घटकाच्या बाबतीत तज्ञ असलेल्या अशा व्यक्तीस परिषदेचा उपाध्यक्ष म्हणून नेमता येईल.

(क) परिषदेमध्ये पुढे दिलेल्या इतर सदस्यांचा समावेश होईल :—

(एक) राज्यातील कृषि विद्यापीठांचे कुलगुरु : पदसिद्ध सदस्य;

(दोन) शासनाचे मुख्य सचिव आणि कृषि विभाग, वित्त विभाग व नियोजन विभाग यांचे सचिव : पदसिद्ध सदस्य;

(तीन) राज्य शासनाद्वारे नियुक्त करावयाचा, भारतीय कृषि संशोधन परिषदेचा एक प्रतिनिधी ;

(चार) प्रत्येक कृषि विद्यापीठ अधिक्षेत्रातून एक याप्रमाणे, राज्य शासनाने नियुक्त करावयाचे संबंधित कार्यकारी परिषदेचे चार अशासकीय सदस्य ;

(पाच) कुलपतीने नेमावयाचा एक सदस्य ;

(सहा) राज्य शासनाने नियुक्त करावयाचे दोन कृषि शास्त्रज्ञ ;

(सात) राज्य शासनाने नियुक्त करावयाचा पूर्णकालिक अधिकारी सदस्य-सचिव.

(३) पोट-कलम (१) मधील उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता पुढील अधिकार व कामे असतील :—

(अ) विद्यापीठाच्या वार्षिक योजना व अशा योजनांचे भाग असणाऱ्या योजना यांस मान्यता देणे ;

(ब) कलम ५४ च्या उपबंधांच्या अधीन, राहून विद्यापीठांच्या वार्षिक वित्तीय अंदाजांना मान्यता देणे ;

(क) अर्थसंकल्पीय अनुदानांचे पुनर्विनियोजन करण्यासाठी म्हणून विद्यापीठाने मांडलेल्या कोणत्याही प्रस्तावास मान्यता देणे ;

(ड) कोणत्याही नवीन विद्या शाखा, पाठ्यक्रम किंवा ज्ञान शाखा किंवा विभाग सुरू करण्यासाठी त्याचप्रमाणे कोणत्याही अभ्यासक्रमासाठी जादा वैकल्पिक विषय सुरू करण्याकरिता विद्यापीठांना परवानगी देणे ;

(ई) कोणत्याही विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या ज्याच्यावरील अंदाजित खर्च रुपये एक लाख किंवा त्याहून अधिक आहे अशा कोणत्याही इमारतींच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देणे ;

(फ) कोणत्याही विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या ज्यावरील अंदाजित खर्च पाच लाख रुपये किंवा त्याहून अधिक आहे अशा साधनसामग्रीच्या खरेदीस प्रशासकीय मान्यता देणे ;

(ग) विद्यापीच्या कार्यात प्रभावी समन्वय घडवून आणण्याच्या आणि त्यांना योग्य मार्गदर्शन व निदेशन करण्याच्या दृष्टीने, पशुसंवर्धन, फलोत्पादन, वनशास्त्र, दुग्धशाळा, विज्ञान व अन्न तंत्रशास्त्र आणि मत्स्यव्यवसाय यांच्याशी संबंधित असलेली कामे धरून, कृषि शिक्षण, अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम यांच्या संबंधात, विद्यापीठांमध्ये पार पाडण्यात आलेल्या कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे ;

(ह) त्यांनी केलेल्या नियतकालिक मूल्यमापनाच्या संदर्भात, विद्यापीठाच्या कामकाजाविषयी कुलपतीला सूचित करणे ;

(आय) परिषदेने घेतलेल्या निर्णयाच्या आधारावर, विद्यापीठास, योजनांतर्गत व योजनेतर अशा दोन्ही प्रकारचे निधी, आवश्यक वाटेल अशा कालांतराने देण्याविषयी राज्य शासनास विनंती करण ;

(जे) राज्य शासनाद्वारे तिच्याकडे निर्दिष्ट केल्या जातील अशा विद्यापीठाच्या कार्याशी संबंधित कोणत्याही बाबींविषयी राज्य शासनास सल्ला देणे ;

(के) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी आनुषंगिक व आवश्यक असेल अशा इतर अधिकारांचा वापर करणे व अशी इतर कामे पार पाडणे.

(४) (अ) कुलपतीस कळवून, परिषदेस, आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कामे पार पाडताना विद्यापीठास आवश्यक ते निदेश देण्याचा अधिकार असेल आणि तो अंतिम व विद्यापीठांवर बंधनकारक असेल ;

(ब) अशा निदेशांची तत्परतेने व योग्यरीत्या अंमलबजावणी करण्यात आली आहे याची खात्री करणे हे संबंधित कुलगुरूचे कर्तव्य असेल आणि या प्रयोजनासाठी कुलगुरूस, कलम १८ च्या पोट-कलम (६) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे आवश्यक ते सर्व अधिकार असतील आणि त्यांचा तो वापर करील.

(५) (अ) राज्य शासन निश्चित करील असे मानधन व भत्ते उपाध्यक्षाला मिळतील ;

(ब) सदस्य-सचिवाची वित्तलब्धि व इतर सेवाशर्ती ह्या, राज्य शासनाने निश्चित केल्याप्रमाणे असतील ;

(क) प्रत्येक अशासकीय सदस्याला, परिषदेच्या बैठकींना हजर राहताना अथवा असा सदस्य म्हणून परिषदेचे इतर कोणतेही काम करण्यासाठी त्याला करावा लागणारा वैयक्तिक खर्च भागविण्यासाठी म्हणून राज्य शासन निश्चित करील असे भत्ते मिळतील;

(६) परिषद, आपले कामकाज चालविण्यासाठी, तिस योग्य वाटेल अशी कार्यपद्धती निर्धारीत करील.

(७) परिषदेच्या सदस्याचे कोणतेही पद रिकामे झालेले असेल किंवा तिच्या रचनेमध्ये कोणताही दो असला तरीही परिषदेस काम करण्याचा अधिकार असेल.

## प्रकरण ४

## विद्यापीठांचे अधिकारी

पीठांचे गरी व यांचे करण.

१३. प्रत्येक विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे खालील प्रवर्गांपैकी एका प्रवर्गात वर्गीकरण करण्यात येईल :—

(अ) कार्यकारी, विद्याविषयक व इतर अधिकारी.—ज्यांना प्रशासकीय प्राधिकार असेल व ज्यांना ह्या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये किंवा परिनियमाद्वारे अशा प्रकारे पदनिर्देशित करण्यात आलेले असेल;

(ब) विद्याविषयक कर्मचारी वर्ग.—ज्यांना अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांसारखे विद्याविषयक स्वरूपाचे काम असेल व जे या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये किंवा परिनियमाद्वारे पदनिर्देशित करण्यात येतील असे प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, अधि-व्याख्याता किंवा प्रयोग निर्देशक किंवा तत्सम व्यावसायिक पद धारण करीत असतील ;

(क) लिपिकवर्गीय कर्मचारी.—जे विद्यापीठाच्या सेवेत असतील व ज्यांचा वरील (अ) व (ब) मध्ये समावेश करण्यात आलेला नसेल.

१ (इतर अधिकारी व परिनियमाद्वारे घोषित करण्यात आलेले अधिकारी)

कारी, षयक इतर कारी.

१४. प्रत्येक विद्यापीठाचे कार्यकारी, विद्याविषयक व इतर अधिकारी खालीलप्रमाणे असतील :—

### (अ) कार्यकारी

(एक) कुलपती.
(दोन) प्रति-कुलपती.
(तीन) कुलगुरू.

### (ब) विद्याविषयक अधिकारी

(चार) निदेशन संचालक.
(पाच) संशोधन संचालक.
(सहा) विस्तार शिक्षण संचालक.
(सात) विद्याशाखांचे अधिष्ठाते.
(आठ) सहयोगी अधिष्ठाते.

### (क) इतर अधिकारी

(नऊ) कुलसचिव.
(दहा) नियंत्रक.
(अकरा) विद्यार्थी कल्याण संचालक. अधिकारी
(बारा) ग्रंथपाल.
(तेरा) परिनियमांन्वये विद्यापीठाचे "विद्याविषयक अधिकारी" किंवा "इतर अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येतील अशा इतर व्यक्ती.

परंतु, एकाच व्यक्तीला "विद्याविषयक अधिकारी" किंवा "इतर अधिकारी" या प्रवर्गामध्ये एकापेक्षा अधिक पदांवर नेमता येईल :

आणखी असे की, "विद्याविषयक अधिकारी" किंवा "इतर अधिकारी" या प्रवर्गामध्ये कोणत्याही वेळी कोणतेही पद भरता येईल किंवा रिकामे ठेवता येईल.

१५. (१) महाराष्ट्राचे राज्यपाल प्रत्येक विद्यापीठाचे कुलपती असतील. कुलपती.

(२) कुलपती हे, त्यांच्या पदपरत्वे, विद्यापीठाचे प्रमुख असतील आणि उपस्थित असतील तेव्हा ते विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या वेळी अध्यक्ष म्हणून काम करतील.

(३) कुलपतीस, आपल्या माहितीसाठी म्हणून, विद्यापीठाच्या कामकाजासंबंधीचे कोणतेही कागदपत्र मागविता येतील आणि विद्यापीठ अशा मागणीचे पालन करील.

(४) कोणतीही सन्मान्य पदवी प्रदान करण्याचा प्रत्येक प्रस्ताव कुलपतीकडून कायम केला जाण्यास अधीन असेल.

(५) कुलपतीस, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा प्राधिकरणाचे, हा अधिनियम परिनियम किंवा विनियम यास अनुसरून नसेल अथवा विद्यापीठाच्या हितसंबंधात बाधक असेल असे कोणतेही कामकाज, लेखी आदेशान्वये, विलोपित करता येईल :

परंतु, कुलपती असा कोणताही आदेश देण्यापूर्वी, असा आदेश का काढण्यात येऊ नये यासंबंधीची कारण दर्शविण्यासाठी अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास फर्मावील आणि तो याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा वेळेच्या आत कोणतेही कारण दर्शविण्यात आले असेल तर, तो त्याचा विचार करील.

(६) कुलपती, ह्या अधिनियमान्वये ठरवून देण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

१६. (१) महाराष्ट्र राज्याचे कृषि मंत्री, प्रत्येक विद्यापीठाचे प्रति-कुलपती असतील आणि ते कुलपतीच्या अनुपस्थितीत विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या वेळी अध्यक्ष म्हणून काम करतील. प्रति-कुलपती

(२) प्रति-कुलपतीला स्वतःच्या माहितीकरिता विद्यापीठाच्या कामकाजासंबंधी असलेले कोणतेही कागदपत्र मागविता येतील व विद्यापीठ अशा मागणीचे पालन करील.

(३) विद्यापीठाच्या कामकाजाचा वार्षिक कार्यक्रम, प्रति-कुलपतीकडे त्याच्या माहितीसाठी पाठविण्यात येईल व त्याने केलेल्या कोणत्याही सूचनेचा, कार्यकारी परिषदेकडून विचार करण्यात येईल.

(४) तसेच, तो, कुलपती, लेखी आदेशाद्वारे, प्रति-कुलपतीकडे सोपवील अशा कुलपतीच्या इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये बजावील, आणि अशा रीतीने अधिकार व कर्तव्ये सोपविणे हे, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा निर्बंधास व शर्तीस अधीन असेल.

आणि पुन्हा महाराष्ट्र शासनाच्या सचिव (कृषि) — चार

१७. (१) प्रत्येक विद्यापीठाच्या कुलगुरूंची या पोट-कलमाच्या उपबंधानुसार, नेमणूक करण्यात येईल. कुलगुरूंची निवड करण्यासाठी, कुलपती तीन व्यक्तींच्या एका समितीची रचना करील व त्यापैकी एका महासंचालक, भारतीय कृषि संशोधन परिषद, कुलपतींनी नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती आणि एक व्यक्ती, कार्यकारी समितीने नामनिर्देशित केलेली संबंधित विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचा अशासकीय सदस्य असेल. तसेच, कुलपती अशा समितीचा अध्यक्ष म्हणून तियांपैकी एकाची नियुक्ती करील. समिती, समितीच्या मते कुलगुरूंचे पद धारण करण्यास योग्य असतील अशा तीनपेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींची एक नामिका तयार करील व ही नामिका कुलपतीला सादर करील. कुलपतीस अशा नामिकेतील व्यक्तींमधून एकाची कुलगुरूंच्या पदासाठी निवड करता येईल व तिची अशा पदावर नेमणूक करता येईल. नामिकेतील व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती कुलपतीस मान्य नसेल किंवा कुलपतीने कुलगुरूंच्या पदासाठी निवड केलेल्या व्यक्तींची कुलगुरूंचे पद स्वीकारण्याची इच्छा नसेल तर, कुलपतीस, उपरोक्त समितीला नवीन नामिका तयार करण्यास फर्माविता येईल. कुलगुरू

उक्त व्यक्तींपैकी एकाची

* २००३ च्या १४ च्या कलम ५(क) अन्वये 'तीन' ऐवजी 'चार'

** २००३ च्या १४ च्या कलम ५(ख) अन्वये वरील मजकूर जादा

(२) कुलपती, विद्यमान कुलगुरूचा पदावधी समाप्त होण्याच्या बऱ्याच आधी, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या समितीच्या रचनेसाठी कार्यवाही सुरू करील. समिती, तिची रचना झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत, नावांची नामिका कुलपतीला सादर करील. जर, समिती दोन महिन्यांच्या मुदतीत नावांची नामिका सादर करण्यात कसूर करील तर, कुलपतीस, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीची, कुलगुरूच्या पदावर नेमणूक करता येईल.

(३) कुलगुरू हा विद्यापीठाचा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल.

(४) कुलगुरू पाच वर्षे मुदतीपर्यंत पद धारण करील व कुलपतीस, मुदतीत वाढ करणाऱ्या आदेशात नमूद करण्यात येईल अशा कारणावरून, अपवादात्मक परिस्थितीत, उक्त मुदतीत, एकूण सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीपर्यंत वाढ करता येईल.

(५) कुलगुरूला तीन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर कुलपतीकडे लेखी राजीनामा सादर करून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. कुलपतीकडून राजीनामा स्वीकारण्यात आल्यानंतरच तो परिणामक्षम होईल.

(६) (अ) कुलपतीस, कुलगुरूने, कलम ७ अन्वये प्रति-कुलपती किंवा कलम १२ अन्वये राज्य परिषदेकडून देण्यात आलेल्या निदेशांची अंमलबजावणी करण्याची आपली जबाबदारी पार पाडण्यात हयगय केली आहे किंवा वाजवी सबबीशिवाय कसूर केली आहे या कारणावरून प्रति-कुलपतीने केलेल्या शिफारशींवरून, कोणत्याही वेळी, आदेशाद्वारे, कुलगुरूस, पदावरून काढून टाकता येईल.

(ब) कुलपतींच्या मते, कुलगुरू या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करीत नसेल किंवा तसे करण्यास नकार देईल तर, किंवा त्याच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा दुरुपयोग करील तर, आणि कुलपतीच्या मते कुलगुरू पदावर चालू राहणे हे विद्यापीठाच्या हितसंबंधास बाधक ठरत असेल तर, कुलपतीस, संबंधित कार्यकारी परिषदेशी विचारविनिमय करून, कोणत्याही वेळी, आदेशाद्वारे, कुलगुरुस काढून टाकता येईल.

(क) खंड (अ) किंवा (ब) याखालील कोणताही आदेश, कुलगुरूस त्याच्या विरुद्ध करावयाच्या कार्यवाहीच्या संबंधात आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, काढण्यात येणार नाही.

(७) कुलगुरूला द्यावयाची वित्तलब्धी व सेवेच्या इतर शर्ती, परिनियमांद्वारे ठरवून देण्यात येतील आणि कुलगुरूने त्याच्या नेमणुकीच्या वेळी मान्य केल्या असतील त्याप्रमाणे असतील, आणि त्यामध्ये त्याच्या नेमणुकीनंतर, त्याचा तोटा होईल अशा रीतीने, त्याच्या संमतीशिवाय, कोणताही फेरबदल करता येणार नाही.

(८) मृत्यू, राजीनामा या कारणामुळे किंवा अन्यथा कुलगुरूचे पद रिकामे झाल्यास, कुलपतीस या कलमाच्या पोट-कलम (१) अनुसार कुलगुरूची रीतसर नेमणूक करण्यात येईपर्यंत, कुलगुरू म्हणून काम पाहण्यासाठी संचालकास किंवा विद्यापीठाच्या किंवा राज्यातील कोणत्याही इतर कृषि विद्यापीठाच्या अधिष्ठात्यास किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीस नामनिर्दिष्ट करता येईल:

परंतु, अशा अंतरिम व्यवस्थेची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.

(९) रजा, आजारीपण किंवा इतर कारणांमुळे कुलगुरूचे पद तात्पुरते रिकामे होईल त्या बाबतीत, प्रति-कुलपती, कुलगुरूंच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी व्यवस्था करील. अशी व्यवस्था करण्यात येईल तोपर्यंत, त्या प्रयोजनार्थ प्रति-कुलपतीने नामनिर्दिष्ट केलेला संचालक किंवा अधिष्ठाता किंवा इतर कोणतेही व्यक्ती, कुलगुरूंच्या पदाची चालू कर्तव्ये पार पाडील:

परंतु, दोन महिन्यांपेक्षा कमी मुदतीसाठी पद रिकामे झाल्याच्या बाबतीत, कुलगुरू, लेखी आदेशाद्वारे, आपली कर्तव्ये, तातडीची उपाययोजना म्हणून, कोणत्याही संचालकाकडे किंवा अधिष्ठात्याकडे

(तेरा) पारितोषिक, त्यांच्या अनुपस्थितीत, कुलसचिवाकडे सोपवील.

घोषित करण्यात येतील

१८. (१) कुलगुरू हा विद्यापीठाचा प्रमुख कार्यकारी अधिकारी असेल. कुलपतीच्या किंवा कुलगुरूचे प्रति-कुलपतींच्या अनुपस्थितीत, तो विद्यापीठाच्या कोणत्याही पदवीदान समारंभाच्या वेळी अध्यक्ष म्हणून अधिकार व काम करील तसेच, तो कार्यकारी परिषदेचा आणि विद्यापरिषदेचा पदसिद्ध सदस्य व अध्यक्ष असेल. कर्तव्ये.

(२) कुलगुरूचे विद्यापीठाच्या कामकाजावर सर्वसाधारण नियंत्रण असेल व विद्यापीठामध्ये शिस्तीचे यथोचित पालन होण्यासाठी तो जबाबदार असेल.

(३) कुलगुरूस, कार्यकारी परिषदेची व विद्यापरिषदेची सभा बोलविण्याचा अधिकार असेल.

(४) हा अधिनियम आणि परिनियम व विनियम यांच्या उपबंधाचे निष्ठापूर्वक पालन केले जाईल याबद्दल खात्री करून घेणे कुलगुरूचे कर्तव्य असेल; आणि त्यास या प्रयोजनाकरिता आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

(५) विद्यापीठाचे योग्य प्रशासन तसेच, वित्तीय प्रशासन आणि अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण कार्यक्रम यांचा दृढ समन्वय व एकात्मीकरण यासाठी कुलगुरू जबाबदार असेल.

(६) कलम ७ अन्वये प्रति-कुलपतीने किंवा कलम १२ अन्वये राज्य परिषदेने, वेळोवेळी, दिलेल्या निदेशांची, विद्यापीठ आणि त्याचे प्राधिकारी व अधिकारी यांच्याकडून त्वरित व रीतसर अंमलबजावणी करवून घेण्यास कुलगुरू जबाबदार असेल आणि या अधिनियमामध्ये किंवा या अधिनियमाखाली केलेले किंवा केल्याचे समजण्यात येणारे परिनियम व नियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्यास, या प्रयोजनासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार असतील आणि त्यांचा तो वापर करील.

(७) कुलगुरू, समुचित अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत, मुख्यालयाच्या ठिकाणी व मुख्यालयाबाहेर, विद्यापीठाकडून चालविण्यात येणारी महाविद्यालये, विभाग, विशेषीकृत अभ्यास परिसंस्था, प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये, वसतिगृहे व शाळा यांची व्यवस्था ठेवील.

(८) कुलगुरूस, विद्यापीठाचे कामकाज योग्य रीतीने चालविण्याकरिता त्यास आवश्यक वाटतील अशा, विद्यापीठ विषयक सर्व कामकाजाचे अहवाल, महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व वसतिगृहे यांच्याकडून मागविता येतील.

(९) कुलगुरू, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा निवास, वर्तणूक व शिस्त यांवर देखरेख व नियंत्रण ठेवील. तसेच तो, विहित करण्यात येईल अशा समितीशी विचारविनिमय करून, विद्यार्थ्यांचे आरोग्य व सर्वसाधारण कल्याण यांच्या संवर्धनाची व्यवस्था करील.

(१०) कुलगुरूस, या अधिनियमात किंवा परिनियमात तरतूद करण्यात अशा विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार असेल.

(११) कुलगुरू, वार्षिक लेखे व ताळेबंद, कार्यकारी परिषदेकडे, वेळेवर सादर करण्यास जबाबदार असेल.

(१२) कुलगुरू, विद्यापीठाची मालमत्ता व निधी धारण करील, त्यावर नियंत्रण ठेवील व त्यांची व्यवस्था पाहील.

(१३) कुलगुरू, विशिष्ट प्रयोजनांसाठी, विद्यापीठाच्या स्वाधीन करण्यात आलेल्या निधीची व्यवस्था ठेवील.

(१४) कुलगुरू, विद्यापीठाचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारती, जागा, उपकरणे व साधने यांची, कलम ५२ अन्वये राज्य परिषदेने मंजूर केलेल्या वित्तीय अंदाजानुसार व त्यास उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीमधून तरतूद करील.

(१५) कुलगुरू, हा अधिनियम व परिनियम याद्वारे व तदन्वये तिला नेमून दिलेल्या अधिकाराचा वापर करताना आणि कर्तव्ये बजावताना, त्या कारणासाठी कार्यकारी परिषदेने नियुक्त करावयाच्या विधी समितीच्या सल्ल्यानुसार, कार्यकारी परिषदेच्या सहमतीने, विद्यापीठाच्या वतीने करार करील ; त्यात फेरबदल करील, तो पुरा किंवा रद्द करील.

(१६) ताबडतोब उपाययोजना करणे आवश्यक आहे असे कुलगुरूचे मत होईल अशा कोणत्याही निकडीच्या परिस्थितीत, तो, प्रति-कुलपतीच्या नियंत्रणास अधीन राहून, त्यास आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करील आणि त्यानंतर कार्यकारी परिषदेस आणि सर्वसाधारण नित्यक्रमात ज्या इतर प्राधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने उक्त बाबीसंबंधात कार्यवाही केली असती त्या प्राधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास, आपण केलेल्या उपाययोजनेबाबत लवकरात लवकर कळवील.

(१७) लगतपूर्वीच्या पोट-कलमान्वये कुलगुरूने केलेल्या कोणत्याही कार्यवाहीमुळे विद्यापीठाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीवर, तिचा तोटा होईल अशा रीतीने, परिणाम होईल त्या बाबतीत, अशा व्यक्तीस, अशी कार्यवाही केल्याबद्दलची नोटीस तिला मिळाली असेल त्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कार्यकारी परिषदेकडे अपील करता येईल व कार्यकारी परिषद, तिच्या पुढील सभेत अपिलावर विचारविनिमय करील व अपिलाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत आपला निर्णय देईल.

(१८) कार्यकारी परिषदेच्या अपिलीय आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश तिला कळविण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कुलपतीकडे अपील करता येईल व अशा अपीलांवरील कुलपतीचा निर्णय अंतिम असेल.

(१९) निकटपूर्वीच्या पोट-कलमांच्या उपबंधास अधीन राहून, कुलगुरू, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांपैकी कोणत्याही कर्मचाऱ्याची नेमणूक, निलंबन, त्याला काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे यासंबंधातील कार्यकारी परिषदेचे आदेश अमलात आणील.

(२०) कुलगुरू, या अधिनियमान्वये ठरवून देण्यात आले असतील व परिनियमांन्वये प्रदान करण्यात येतील किंवा त्याजवर लादण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

कुलसचिव. १९. (१) प्रत्येक विद्यापीठाचा कुलसचिव हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनीय अधिकारी असेल. तो, राज्य शासन वेळावेळी निश्चित करील अशा मुदतीसाठी, राज्य शासनाने, नेमलेला प्रतिनियुक्तीवरील अधिकारी असेल. त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे असतील.

(२) कुलसचिव हा, विद्यापीठाच्या अभिलेखांच्या व सामाईक शिक्क्याच्या अभिरक्षेसाठी जबाबदार असेल. तो, कार्यकारीपरिषदेचा व विद्यापरिषदेचा पदसिद्ध सचिव असेल आणि कामकाजासंबंधीची सर्व उपलब्ध माहिती त्याच्यापुढे सादर करणे त्यास बंधनकारक असेल. विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासंबंधीचे अर्ज तो स्वीकारील व सर्व पाठ्यक्रम, अभ्यासक्रम व आवश्यक असलेली इतर माहिती यासंबंधी कायम स्वरूपाचे अभिलेख ठेवील.

(३) कुलसचिवास, कुलगुरूस संबोधून आपल्या स्वाक्षरीसह आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. ज्या तारखेपासून पदमुक्त होण्याची कुलसचिवांची इच्छा असेल, त्या तारखेच्या सामान्यपणे साठ दिवस अगोदर, राजीनामा कुलगुरूच्या स्वाधीन करण्यात येईल; परंतु कार्यकारी परिषदेला त्यास त्यापूर्वीही पदमुक्त करता येईल. पदमुक्त झाल्याच्या तारखेपासून राजीनामा परिणामक्षम होईल.

(४) कोणत्याही कारणास्तव रजेवर गेल्यामुळे कुलसचिवांच्या तात्पुरत्या अनुपस्थितीत किंवा इतर कोणत्याही रीतीने रिकामी झालेली जागा भरण्यात येईतोपर्यंत, कुलगुरू, तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी, कुलसचिव म्हणून काम करण्याकरिता, कोणत्याही योग्य व्यक्तीची नेमणूक करील.

(५) कुलसचिव, विद्यार्थ्यांनी घेतलेले अभ्यासक्रम, मिळविलेली श्रेणी, देण्यात आलेल्या पदव्या, मिळविलेली पारितोषिके किंवा इतर प्राविण्ये व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीशी संबंधित असतील अशा इतर बाबी धरून, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे कायम स्वरूपाचे अभिलेख ठेवण्यास जबाबदार असेल.

(६) कुलसचिव, ह्या अधिनियमान्वये ठरवून देण्यात आले असतील किंवा परिनियमांन्वये किंवा कुलगुरूकडून, त्यास प्रदान करण्यात येतील किंवा त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये बजावील.

नियंत्रक २०. (१) प्रत्येक विद्यापीठाचा नियंत्रक हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल. तो, राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा मुदतीसाठी, राज्य शासनाने नेमलेल्या प्रतिनियुक्तीवरील भारतीय लेखा परीक्षा व लेखा सेवा अथवा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यातील अधिकारी असेल. त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे असतील.

(२) नियंत्रक, कुलगुरूच्या सर्वसाधारण देखरेखीखाली व नियंत्रणाखाली विद्यापीठाची मालमत्ता धारण करील व त्यांची व गुंतवणुकांची व्यवस्था पाहील; आणि विद्यापीठाला त्याच्या वित्तीय धोरणासंबंधात सल्ला देईल.

(३) नियंत्रक,—

(अ) अर्थसंकल्पात अधिकृत मंजुरी न देण्यात आलेला असा कोणताही खर्च विद्यापीठाकडून केला जाणार नाही हे पाहील;

(ब) अर्थसंकल्पात प्राधिकृत केल्याप्रमाणेच खर्च केले जात आहेत याची खात्री करून घेण्यास जबाबदार असेल. नवीन कार्यक्रम गतिमान करण्यासाठी बदलत्या गरजांमुळे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे कोणतेही फेरबदल करणे आवश्यक असेल तेव्हा, ते करणे व संबंधित प्राधिकाऱ्याकडून त्यांना त्वरेने मान्यता मिळवणे यास जबाबदार असेल;

(क) ज्यामुळे या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचा किंवा त्याखालील तयार करण्यात आलेल्या कोणत्याही परिनियमांचा भंग होईल किंवा ज्यासाठी, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा कोणत्याही अशा परिनियमाद्वारे, तरतूद करणे आवश्यक असेल असा कोणताही खर्च करण्यास परवानगी देणार नाही ;

(ड) कोणत्याही विवक्षित प्रकरणी, अनधिकृत खर्चा संबंधात किंवा इतर वित्तीय नियमबाह्य गोष्टींसंबंधात खुलासा मागवण्यात यावा असे कार्यकारी परिषदेला प्रस्तावित करील आणि दोषी व्यक्तीविरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करील.

(४) नियंत्रकास, कुलगुरूस संबोधून स्वत:च्या स्वाक्षरीनिशी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. असा राजीनामा हा, नियंत्रकास आपले ज्या तारखेस पदमुक्त होण्याची इच्छा असेल त्या तारखेच्या सामान्यत: साठ दिवस अगोदर कुलगुरूच्या स्वाधीन करण्यात येईल. परंतु, कार्यकारी परिषदेस त्यास त्यापूर्वी पदमुक्त करता येईल. पदमुक्त करण्यात आल्याच्या तारखेपासून असा राजीनामा परिणामक्षम होईल.

(५) नियंत्रक, या अधिनियमान्वये नमूद करण्यात आलेले असतील अशा किंवा परिनियमाद्वारे किंवा कुलगुरूंकडून त्याला प्रदान करण्यात येतील अशा किंवा त्याच्या लादण्यात येतील अशा अन्य अधिकारांचा वापर करील व अशी अन्य कर्तव्ये पार पाडील.

**विद्याशाखांचे अधिष्ठाते.** २१. (१) प्रत्येक विद्यापीठाचा प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता पूर्णकाल वेतन अधिकारी असेल व कलम ५८ अन्वये रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून कुलगुरूंकडून त्याची नियुक्ती करण्यात येईल.

(२) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता विद्याशाखेचा मुख्य कार्यकारी व विद्याविषयक अधिकारी असेल व तिच्या प्रशासनासाठी तो कुलगुरूस जबाबदार असेल.

**विद्याशाखेच्या अधिष्ठात्याची कर्तव्ये.** २२. (१) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता, विद्याशाखेत समाविष्ट असलेल्या विभागातील अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांचे संघटन करण्यासाठी व ते चालविण्यासाठी जबाबदार असेल आणि त्या प्रयोजनाकरिता तो संबंधित विभागाच्या प्रमुखाशी विचारविनिमय करून आवश्यक असतील असे आदेश देईल.

(२) अधिष्ठाता, विद्याशाखेसंबंधातील परिनियम व विनियम यांचे पालन होत आहे हे पाहील व त्यासाठी तो जबाबदार असेल.

(३) तो विद्याशाखेच्या सभांचा अध्यक्ष राहील.

(४) तो धोरणे आखील व ती विचारार्थ विद्यापरिषदेकडे सादर करील.

(५) तो विद्याशाखेच्या वेगवेगळ्या विभागांच्या कामाचे अहवाल कुलगुरूस देईल.

(६) तो विद्याशाखेच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची नोंदणी व प्रगती यांवर देखरेख ठेवील.

(७) तो महाविद्यालये, शाळा व संशोधन परिसंस्था यांसाठी नेमून देण्यात आलेल्या इमारती व साधनसामग्री यांच्या योग्य वापरासंबंधी कुलगुरूला जबाबदार असेल.

(८) तो तांत्रिक क्षेत्रातील समुचित अधिकारी व कर्मचारी यांच्याशी विचारविनिमय करून अर्थसंकल्प तयार करील.

(९) प्रत्येक अधिष्ठात्यास या अधिनियमांमध्ये ठरवून देण्यात आले असतील किंवा विहित करण्यात येतील असे इतर अधिकार असतील व अशी इतर कर्तव्ये तो पार पाडील.

शिक्षण संचालक. २३. (१) प्रत्येक विद्यापीठाचा शिक्षण संचालक हा विद्यापीठाचा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल व कलम ५८ अन्वये रचना केलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून त्याची कुलगुरूकडून नियुक्ती करण्यात येईल.

(२) संचालक, कुलगुरूच्या हाताखाली प्रत्यक्ष काम करील व महाविद्यालये आणि इतर अध्यापन परिसंस्था यांची कामे यथोचितरित्या पार पाडण्यासाठी तो जबाबदार असेल व तो विद्याशाखांचे अधिष्ठाते व इतर अधिकारी यांच्या संपूर्ण सहकार्याने, विद्यापीठाच्या सर्व घटक व संलग्न महाविद्यालयांतील शिक्षणाचा समन्वय करील व त्याबाबत मार्गदर्शन करील.

(३) संचालक ह्या अधिनियमामध्ये ठरवून दिलेल्या आणि विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

संशोधन संचालक. २४. (१) प्रत्येक विद्यापीठाचा संशोधन संचालक विद्यापीठाचा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल व कलम ५८ अन्वये रचना केलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरूंकडून त्याची नेमणूक करण्यात येईल

(२) संशोधन संचालक प्रत्यक्षतः कुलगुरूच्या हाताखाली काम करील व विद्यापीठ अधिक्षेत्रातील सर्व संशोधन केंद्रांची कार्ये योग्यरीतीने पार पाडली जात आहेत हे पाहण्यास तो जबाबदार असेल व तो विद्याशाखांचे अधिष्ठाते व इतर अधिकारी यांच्या संपूर्ण सहकार्याने विद्यापीठात चालणाऱ्या सर्व संशोधन कार्यांचा समन्वय करील.

(३) संचालक या अधिनियमामध्ये ठरवून दिलेल्या व विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

विस्तार शिक्षण संचालक. २५. (१) प्रत्येक विद्यापीठाचा विस्तार शिक्षण संचालक हा विद्यापीठाचा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल व कलम ५८ अन्वये रचना केलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरूंकडून त्याची नेमणूक करण्यात येईल.

(२) संचालक प्रत्यक्षतः कुलगुरूच्या हाताखाली काम करील आणि तो विद्याशाखांचे अधिष्ठाते व इतर अधिकारी यांच्या संपूर्ण सहकार्याने विद्यापीठाच्या सर्व विस्तार शिक्षण कार्यक्रमांचा समन्वय करण्यास जबाबदार असेल.

(३) संचालक, या अधिनियमामध्ये ठरवून दिलेल्या व विहित करण्यात येतील अशा इतर अधिकाराचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

विद्यार्थी कल्याण संचालक. २६. (१) प्रत्येक विद्यापीचा विद्यार्थी कल्याण संचालक विद्यापीठाचा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल व याबाबतीत केलेल्या परिनियमांच्या उपबंधानुसार रचना केलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरूंकडून त्याची नेमणूक करण्यात येईल.

(२) संचालक, प्रत्यक्ष कुलगुरूंच्या हाताखाली काम करील व विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय करणे, शिष्यवृत्त्या, फी-माफी यासंबंधातील संधी, वैद्यकीय सोयी, अभ्यासेतर कार्य, विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संपर्क, विद्यार्थ्यांना सल्ला देणे, नोकऱ्यांची संधी, स्नातकांना नोकऱ्या मिळवून देणे व त्यांच्या इतर समस्या यांसारख्या विद्यार्थ्यांशी संबंधित अशा सर्व बाबी हाताळण्यास तो जबाबदार असेल.

(३) संचालक, या अधिनियमामध्ये ठरवून दिलेल्या व विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

सहयोगी अधिष्ठाता. २७. (१) सहयोगी अधिष्ठाता विद्यापीठाचा पूर्णकाल वेतनी अधिकारी असेल व कलम ५८ अन्वये रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरूंकडून त्याची नेमणूक करण्यात येईल.

(२) सहयोगी अधिष्ठाता विहित केलेल्या प्रदेशाच्या हद्दीमध्ये सर्व स्तरांवरील अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षणविषयक कार्यक्रम चालविण्यासाठी जबाबदार असेल. तसेच, तो एखाद्या घटक महाविद्यालयाचा प्राचार्यही असेल.

(३) सहयोगी अधिष्ठाता हा या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये घालून देण्यात येतील आणि विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

विद्यापीठाच्या सेवेच्या शर्ती व ठरविण्याचे अधिकार. २८. या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, प्रत्येक विद्यापीठाच्या सर्व कर्मचाऱ्यांची पदनामे, कर्मचाऱ्यांच्या अर्हता, सेवा प्रवेशाची पद्धत, वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती व त्यांचे अधिकार व कर्तव्ये ही परिनियम व विनियम यांद्वारे वेळोवेळी ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण ५

## विद्यापीठांची प्राधिकरणे

विद्यापीठांची प्राधिकरणे. २९. प्रत्येक विद्यापीठांची पुढील प्राधिकरणे असतील :—

(एक) कार्यकारी परिषद,

(दोन) विद्या परिषद,

(तीन) विद्या शाखा,

(चार) अभ्यास मंडळे,

(पाच) परिनियमाद्वारे विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून जाहीर करण्यात येतील अशा विद्यापीठाच्या इतर संस्था.

कार्यकारी परिषद. ३०. (१) प्रत्येक विद्यापिठाची कार्यकारी परिषद ही विद्यापीठाचे कार्यकारी प्राधिकरण असेल व ती पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष;

(दोन) कृषि संचालक किंवा अपर संचालक, कृषि;

(तीन) पशुसंवर्धन संचालक किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेली, सहसंचालक, पशुसंवर्धन, याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल, अशी व्यक्ती;

(चार) उद्यानविद्या संचालक किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेली, सहसंचालक, उद्यानविद्या याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल, अशी व्यक्ती;

(पाच) मुख्य वन संरक्षक किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेली वनसंरक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल, अशी व्यक्ती;

(सहा) कुलगुरूकडून आळीपाळीने नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचा, विद्यापीठाचा एक संचालक (अध्यापन, संशोधन किंवा विस्तार शिक्षण);

(सात) कुलगुरूकडून आळीपाळीने नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचा एक अधिष्ठाता;

(आठ) कुलगुरूशी विचारविनिमय करून, कुलपतीकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचा, क्रियात्मक संशोधनाचा पुरेसा अनुभव असलेला एक नामवंत कृषि वैज्ञानिक;

(नऊ) प्रति-कुलपतीकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचे तीन प्रगतीशील शेतकरी;

(दहा) भारतीय कृषि संशोधन परिषदेचा एक प्रतिनिधी;

(अकरा) राज्य शासनाकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचा एक कृषि उद्योजक;

(बारा) विधानसभेने आपल्या सदस्यांमधून निवडलेले महाराष्ट्र विधानसभेचे तीन सदस्य;

(तेरा) विधानपरिषदेने आपल्या सदस्यांमधून निवडलेले महाराष्ट्र विधानपरिषदेचे दोन सदस्य;

(चौदा) प्रति-कुलपतीकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचा, विद्यापीठ अधिक्षेत्रातील दोन जिल्हा परिषदांच्या कृषि समित्यांचे सभापती ;

(पंधरा) कुल सचिव हा कार्यकारी परिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

(२) (अ) भारतीय कृषि संशोधन परिषदेचा प्रतिनिधी असेल किंवा ज्याला कुलपतीने नामनिर्दिष्ट केले असेल किंवा ज्याला राज्य शासनाने, कृषि उद्योजक असल्याने, नामनिर्दिष्ट केले असेल असा सदस्य, तीन वर्षांसाठी पद धारण करील.

(ब) महाराष्ट्र विधानसभा किंवा महाराष्ट्र विधानपरिषद यांनी निवडलेला सदस्य हा, सदस्य म्हणून त्यास निवडून देणाऱ्या मंडळाचा तो सदस्य असण्याचे बंद झाल्यावर, लगेच, कार्यकारी परिषदेचा सदस्य असण्याचेही बंद होईल.

(क) कोणत्याही जिल्हा परिषदेच्या कृषि समितीचा जो सभापती, पोट-कलम (१) च्या खंड चौदा अन्वये कार्यकारी परिषदेचा सदस्य होईल असा सभापती, उक्त समितीचा सभापती असण्याचे बंद झाल्याबरोबर किंवा कार्यकारी परिषदेवरील नियुक्तीच्या तारखेपासून एक वर्षाची मुदत संपल्यानंतर, या दोहोंपैकी जे आधी घडेल त्यावेळी, तो, कार्यकारी परिषदेचा सदस्य असण्याचे बंद होईल.

कार्यकारी परिषदेचे आणि राज्य परिषदेच्या पर्यंत अधिकार व कर्तव्ये.

३१. ह्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा परिनियमाद्वारे विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, कार्यकारी परिषद पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) विद्यापीठाकडे कोणते कार्यक्रम असावेत याची स्थूलरूपाने आखणी करणे;

(दोन) विद्यापीठाच्या वार्षिक अहवालावर चर्चा करणे आणि त्याचा आढावा घेणे व त्यावर सूचना करणे;

(तीन) विद्यापीठाच्या वार्षिक वित्तीय अंदाजांवर विचार करणे व ते तयार करणे आणि त्यावर सूचना करणे;

(चार) राज्य शासनाच्या मान्यतेने, विद्यापीठ मालमत्तेच्या तारणावर, विद्यापीठाच्या प्रयोजनांसाठी कर्ज घेणे;

(पाच) परिनियमांस अधीन राहून, विद्यापीठाच्या वतीने मृत्यूपत्रदाने, देणग्या आणि विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात आलेली कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता स्वीकारणे;

(सहा) विद्यापीठाच्या वतीने कोणत्याही स्थावर किंवा जंगम मालमत्तेचे हस्तांतरण करणे;

(सात) विद्यार्थ्यांसाठी घटक महाविद्यालये, विभाग, वसतीगृहे, संशोधन केंद्रे, कृषिक्षेत्रे, शाळा, ग्रंथालये, प्रयोगशाळा व प्रात्यक्षिक केंद्रे सुरू करणे व त्यांची व्यवस्था पाहणे आणि कर्मचाऱ्यांना इतर सोयी पुरवणे;

(आठ) विद्यापीठाचे आर्थिक-व्यवहार, लेखे व गुंतवणूक यांची व्यवस्था ठेवणे व त्यांचे नियमन करणे;

(नऊ) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे फी व इतर खर्च निश्चित करणे, त्यांची मागणी करणे व ती स्वीकारणे;

(दहा) संशोधन कार्य चालविण्यासाठी आणि ज्ञानामध्ये प्रगती व त्याचा प्रसार यासाठी तिला योग्य वाटेल अशा ज्ञानशाखेतील आणि पाठ्यक्रमातील शिक्षण, अध्यापन व प्रशिक्षण यासाठी तरतूद करणे;

(अकरा) महाविद्यालये आणि पदव्युत्तर परिसंस्था यांच्या संलग्नीकरणास मान्यता देणे;

(बारा) संलग्न महाविद्यालयांतील व मान्यताप्राप्त परिसंस्थांतील शैक्षणिक दर्जास मान्यता देणे व तो राखण्यात येत आहे याबद्दल खात्री करून घेणे;

(तेरा) उच्च शिक्षण व संशोधन परिसंस्था यांना मान्यता देणे आणि त्यांची मान्यता काढून घेणे;

(चौदा) पुढील गोष्टींसाठी तरतूद करणे :—

(अ) ग्रामीण जनतेचे विस्तार शिक्षण,

(ब) विद्यापीठाचे, संबंधित शासकीय विभागांचे आणि जिल्हा परिषदांचे कर्मचारी सेवेत असताना त्यांना प्रशिक्षण देणे,

(क) शारीरिक व लष्करी प्रशिक्षण देणे,

(ड) क्रीडा व व्यायाम मंडळे,

(इ) विद्यार्थ्यांचे कल्याण;

(पंधरा) संलग्न महाविद्यालयांच्या व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या तपासणीची व्यवस्था करणे व ती करण्याबद्दल निदेश देणे व त्यांची कार्यक्षमता राहावी आणि त्यांच्या कर्मचारीवर्गाच्या सेवेची खातरजमा करण्यासाठी म्हणून अनुदेश देणे; आणि अशा अनुदेशांकडे दुर्लक्ष करण्यात आल्यास, त्यांच्या संलग्नीकरणाच्या किंवा मान्यता देण्यासंबंधीच्या शर्तीत फेरफार करण्याविषयी किंवा तिला योग्य वाटेल अशी इतर उपाययोजना करण्याविषयी शिफारस करणे;

(सोळा) संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांतील कर्मचारीवर्गाची वेतनश्रेणी आणि त्यांच्या सेवेच्या शर्ती निश्चित करणे व त्यांचे पालन होत आहे यांची खात्री करून घेणे;

(सतरा) परिनियम व विनियम करणे, त्यात सुधारणा करणे व त्यांचे निरसन करणे;

(अठरा) विनियम स्वीकारणे, नाकारणे किंवा विद्यापरिषदेकडे किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे ते विचारार्थ परत पाठविणे;

(एकोणीस) परीक्षक नेमणे, त्यांचे जर काही पारिश्रमिक असल्यास, ते निश्चित करणे आणि विद्यापीठाच्या परीक्षा व इतर चाचणी परीक्षा घेण्याची व त्यांचे निकाल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणे;

कार्यकारी परिषदेच्या सभा.

विद्यापरिषद.

(वीस) विद्यापीठ यथोचितरीत्या चालावे म्हणून तिला आवश्यक वाटतील अशी, स्थायी किंवा तात्पुरती, मंडळे व समित्या नेमणे व त्यांची रचना, कामे आणि मुदत निश्चित करून देणे ;

(एकवीस) तिला योग्य वाटतील अशा आपल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार कुलगुरूस किंवा विद्यापीठांच्या किंवा तिने नेमलेल्या मंडळाच्या किंवा समितीच्या इतर अधिकाऱ्यास परिनियमां-द्वारे प्रदान करणे ;

(बावीस) विद्यापीठाच्या सामायिक शिक्क्याचा नमुना ठरविणे व त्याची अभिरक्षा आणि त्याच्या वापराचे नियमन यासंबंधी तरतूद करणे ;

(तेवीस) अधिछात्रवृत्या (प्रवासी अधिछात्रवृत्त्यांसह), शिष्यवृत्या, छात्रवृत्त्या, विद्यार्थीवेतने, पदके व पारितोषिके मंजूर करणे ;

(चोवीस) पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी बहाल करण्यासंबंधी कुलपतीस शिफारस करणे ;

(पंचवीस) सन्मान्य पदव्या किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी मंजूर करणे ;

(सव्वीस) विद्यापीठ व त्याच्या नियंत्रणाखालील महाविद्यालये व संस्था यांच्या विद्यार्थ्यांच्या व कर्मचारीवर्गाच्या गरजा भागवण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांसाठी तरतूद करणे ;

(सत्तावीस) ह्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तिला प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे व तिच्यावर लादण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे ;

(अठ्ठावीस) ज्याकरिता या अधिनियमात किंवा परिनियमात अन्यथा कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठाच्या सर्व अधिकारांचा व या अधिनियमाच्या किंवा परिनियमांच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक आहेत अशा इतर सर्व अधिकारांचा वापर करणे.

कार्यकारी परिषदेच्या सभा. ३२. (१) कार्यकारी परिषदेची सभा, कुलगुरू ठरवील अशा तारखांना, दर दोन महिन्यांतून एकदा किंवा आवश्यक वाटेल त्याप्रमाणे त्यापेक्षा अधिकवेळा भरविण्यात येईल. परिषदेच्या सर्व सभा विद्यापीठाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात येतील परंतु, कुलपतीच्या पूर्वमान्यतेने, तिची कोणतीही सभा इतर कोणत्याही ठिकाणी घेता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये कुलगुरूंकडून कार्यकारी परिषदेच्या सभेसाठी तारीख निश्चित करण्यात येईल तेव्हा कुलसचिव अशा सभेची, पूर्ण दहा दिवसांची लेखी नोटीस परिषदेच्या सदस्यांना देईल.

विद्यापरिषद. ३३. (१) प्रत्येक विद्यापीठाची विद्यापरिषद ही विद्यापीठाचे सल्लागार मंडळ म्हणून काम करील आणि तिला सर्व विद्याविषयक, संशोधनविषयक व विस्तार शिक्षणविषयक बाबतीत, कुलगुरूला व कार्यकारी परिषदेला सल्ला देण्याचा अधिकार असेल.

(२) विद्यापरिषद पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) कुलगुरू—**पदसिद्ध** अध्यक्ष,
(दोन) शिक्षण संचालक,
(तीन) संशोधन संचालक,
(चार) संचालक, विस्तार शिक्षण,
(पाच) विद्यार्थी कल्याण ~~संचालक,~~ अधिकारी *
(सहा) अधिष्ठाते, विद्याशाखा,
(सात) सहयोगी अधिष्ठाते,
(आठ) संलग्न महाविद्यालयांचे व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य,
(नऊ) विद्याशाखांचे विभाग प्रमुख,
(दहा) संशोधन केंद्राचे प्रभारी मुख्य संशोधन अधिकारी,
(अकरा) मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी,
(बारा) विभाग प्रमुखाखेरीज विद्याशाखेने निवडलेला प्रत्येक विद्याशाखेतील विद्याविषयक कर्मचारीवर्गाचा एक सदस्य. सदस्य-

* परंतु त्याला मतदानाचा हक्क असणार नाही.

कुलसचिव हा विद्यापरिषदेचा **पदसिद्ध** सचिव असेल.


* क्र. 2003 च्या १४ च्या कलम ९ (२) व (२१) अन्वये [illegible]

(३) विद्यापरिषदेस, शेतीच्या विविध अंगांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे म्हणून चारापेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांना, विहित करण्यात येईल अशा मुदतीसाठी व अशा रीतीने स्वीकृत करून घेता येईल आणि अशा स्वीकृत सदस्यांना परिषदेच्या कामकाजात भाग घेण्याचा व तसेच परिषदेच्या इतर कोणत्याही सदस्यांप्रमाणे मतदानाचा अधिकार असेल.

(४) परिषदेची सभा प्रत्येक तिमाही किंवा सहामाही सत्रभागाच्या प्रारंभीपूर्वी निदान एकदा तरी भरेल.

**विद्या-परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.** ३४. (१) ह्या अधिनियमाच्या अथवा परिनियमांच्या उपबंधांन्वये किंवा तदनुसार घालून देण्यात येतील अशा शर्तींस अधीन राहून, विद्यापरिषद, विद्यापीठातील पाठ्यक्रम, अभ्यासक्रम व अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण-पद्धती यांचे आयोजन करणे व ते चालवणे यासंबंधात अभ्यास करील व त्याबाबत शिफारशी करील.

(२) पूर्ववर्ती उपबंधांच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, विद्यापरिषद खालील अधिकारांचा वापर करील व खालील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) महाविद्यालये, विभाग, संशोधन केंद्रे, ग्रंथालये, प्रयोगशाळा, प्रात्यक्षिक केंद्रे, यांच्या स्थापनेसंबंधी आणि कृषि विकासाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असेल असे इतर कार्य यासंबंधी प्रस्ताव करणे ;

(दोन) कलम १४ मध्ये विनिर्दिष्ट केलेले विद्याविषयक अधिकारी, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, अधिव्याख्याता, प्रयोग निर्देशक यांची आणि विस्तार शिक्षण धरून, संशोधन केंद्रांच्या ठिकाणी पदे निर्माण करण्यासाठी व उक्त पदांसाठी आवश्यक असलेल्या अर्हता, त्यांची कर्तव्ये, वित्तलब्धी व सेवेच्या इतर शर्ती यासंबंधी कार्यकारी परिषदेस शिफारशी करणे ;

(तीन) अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण या विभागांची रचना व पुनर्रचना यासंबंधीच्या योजना तयार करणे, त्यात फेरबदल करणे व त्यांचे पुनरीक्षण करणे ;

(चार) संबंधित विद्याशाखा व अभ्यासमंडळे यांच्याशी विचारविनिमय करून, पदव्या, पदविका व प्रमाणपत्रे यांच्या अभ्यासक्रमाविषयी विनियम करणे ;

(पाच) विद्यापीठात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंबंधी विनियम करणे ;

(सहा) विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांबाबत आणि ज्या शर्तींवर विद्यार्थ्यांना अशा परीक्षांना बसता येईल त्या शर्तींबाबत विनियम करणे ;

(सात) स्नातकोत्तर अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांबाबत कार्यकारी परिषदेस शिफारशी करणे ;

(आठ) विविध विद्याशाखांना विषय वाटून देण्यासंबंधी प्रस्ताव मांडणे ;

(नऊ) या अधिनियमाच्या आणि परिनियमांच्या उपबंधांद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात येतील किंवा लादण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे व अशी इतर कर्तव्ये बजाविणे.

**विद्याशाखा.** ३५. (१) प्रत्येक विद्यापीठ खालील शाखांपैकी सर्व किंवा कोणत्याही शाखा तसेच परिनियमांनुसार वेळोवेळी ज्यांची रचना करण्यात येईल अशा इतर शाखा बनवील :—

(एक) कृषि (कृषि अर्थशास्त्र व पशुसंवर्धन धरून),

(दोन) पशुवैद्यकशास्त्र,

(तीन) कृषि तंत्रशास्त्र,

(चार) कृषि अभियांत्रिकी,

(पाच) गृहविज्ञान,

(सहा) मूलविज्ञान व मानवविज्ञान,

(सात) स्नातकोत्तर अभ्यासक्रम,

(आठ) निम्न कृषि शिक्षण,

(नऊ) मत्स्यव्यवसाय (सागरी जीवशास्त्रासह),

(दहा) वनशास्त्र,

प्रत्येक विद्याशाखेचे विषय परिनियमांन्वये निश्चित करण्यात येतील.

(२) विद्यापरिषदेच्या शिफारशींस व कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, प्रत्येक विद्याशाखेकडे निनिराळ्या ज्ञानशाखांतील अभ्यासक्रमांचे अध्यापन, संशोधन कार्य आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम यांचा कार्यभार राहील.

(३) प्रत्येक विद्याशाखेचा एक अधिष्ठाता असेल. विद्याशाखेचा तो मुख्य विद्याविषयक अधिकारी असेल व परिनियम व विनियम यांच्या यथोचित पालनास तो जबाबदार असेल. तो विद्याशाखेचा **पदसिद्ध** अध्यक्ष असेल.

(४) निम्न कृषि शिक्षण विद्याशाखेखेरीज, प्रत्येक विद्याशाखा पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) विद्याशाखेचा अधिष्ठाता—**पदसिद्ध** अध्यक्ष.

(दोन) विद्याशाखेतील सहयोगी अधिष्ठाता,

(तीन) विभागप्रमुख,

(चार) विभाग प्रमुखाखेरीज, विभागाच्या विद्याविषयक कर्मचारीवर्गातील सदस्यांनी निवडून द्यावयाचा प्रत्येक विभागाचा एक प्राध्यापक,

(पाच) मुख्य संशोधन अधिकारी,

(सहा) मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी,

(सात) संबद्ध विद्याशाखेतील संलग्न महाविद्यालयांचे व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य,

(आठ) संबंधित गटांनी निवडावयाचे दोन सहयोगी प्राध्यापक, दोन सहाय्यक प्राध्यापक व दोन अधिव्याख्याते.

निवडण्यात आलेल्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षे असेल.

(५) निम्न कृषि शिक्षण विद्याशाखा पुढील सदस्यांनी मिळून होईल :—

(एक) विद्याशाखेचा अधिष्ठाता—**पदसिद्ध** अध्यक्ष.

(दोन) विहित केलेल्या निम्न कृषि शिक्षण गटाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संबंधित गटातील संस्थांच्या प्रमुखांनी त्यांच्यामधून निवडलेले दोन सदस्य.

निवडलेल्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षांचा असेल.

(६) विस्तार शिक्षण कार्यकर्त्यांच्या योग्य प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यासाठी, विद्याशाखेस, शासनाचे संबंधित अधिकारी, किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेचे अधिकारी, सदस्य म्हणून स्वीकृत करता येतील ; त्यांची संख्या चारपेक्षा अधिक असणार नाही आणि विहित करण्यात येईल अशा मुदतीसाठी व अशा रीतीने त्यांची निवड करण्यात येईल.

(७) प्रत्येक विद्याशाखेची सभा तिमाहीत किंवा सहामाहित किमान एकदा भरेल, परंतु उक्त सभा, विद्याशाखेच्या शिफारशींचा विद्यापरिषदेला विचार करता यावा म्हणून विद्यापरिषदेच्या सभेच्या पुरेशी अगोदर घेण्यात येईल.

विद्याशाखांचे अधिकार व कर्तव्ये.

३६. निर्णय घेण्याच्या विद्यापरिषदेच्या अधिकारास अधीन राहून विद्याशाखांना सर्व प्रशासकीय व तांत्रिक बाबींचा विचार करता येईल व त्याबाबत विद्या परिषदेला शिफारशी करता येतील. शक्य तेथवर, विद्यापरिषद, निर्णयाच्या बाबतीत संबंधित विद्याशाखेचे मार्गदर्शन घेईल. प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता, धोरणविषयक बाबी वगळता, विद्याशाखेने अंगीकारलेल्या ठरावावर कार्यवाही करील. परंतु कुलगुरूस त्याप्रमाणे कळविणे आवश्यक असेल. प्रत्येक विद्याशाखेस, विहित करण्यात येईल अशा विषयांसाठी व अशा रीतीने, अभ्यासमंडळाची रचना करता येईल व उक्त अभ्यासमंडळ हे विहित करण्यात येईल इतक्या सदस्यांचे मिळून होईल व विहित करण्यात येईल तेवढ्या कालावधीसाठी राहील. विद्याशाखेचे इतर अधिकार व कर्तव्ये ही विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण ६

## परिनियम आणि विनियम

परिनियम.

३७. या अधिनियमाच्या आणि त्या खाली करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधांस अधीन राहून परिनियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(अ) विद्यापीठाच्या प्राधिकरणांची रचना, अधिकार व कर्तव्ये आणि इतर संस्था अशी प्राधिकरणे असल्याचे घोषित करणे ;

(ब) कुलगुरूच्या वित्तलब्धी आणि त्याच्या सेवेच्या इतर शर्ती आणि त्याचे अधिकार व कर्तव्ये ;

(क) विद्यापीठाच्या निरनिराळ्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची पदनामे, अर्हता, सेवाप्रवेशाची पद्धती, वेतन, भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(ड) विद्याशाखांची रचना, पुनर्रचना किंवा त्या विसर्जित करणे आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(इ) विद्याशाखांमध्ये अध्यापन विभागांची स्थापना ;

(फ) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या फायद्याकरिता निवृत्तिवेतन किंवा भविष्य निर्वाह निधी किंवा विमा योजना या सर्व किंवा यांपैकी एक किंवा अधिक योजना चालू करणे ;

(ग) संलग्न महाविद्यालयांतील व मान्यताप्राप्त परिसंस्थांतील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, अधिव्याख्याते, प्रयोगनिर्देशक आणि विद्याविषयक इतर प्रवर्गातील कर्मचारी यांची पदनामे, अर्हता, सेवाप्रवेशांची पद्धती, वेतन, भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती ;

(ह) स्नातकांची नोंदणी करणे व नोंदलेल्या स्नातकांची नोंदवही ठेवणे ;

(आय) इतर विद्यापीठांच्या किंवा शैक्षणिक संस्थांच्या परीक्षांना, विद्यापीठाच्या तत्सम परीक्षांच्या समतुल्य म्हणून मान्यता देणे ;

(ज) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी कोणतीही इतर बाब ;

(के) या अधिनियमाचे उपबंध अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेली इतर कोणतीही बाब.

परिनियम कसे करण्यात येतील. ३८. (१) प्रत्येक विद्यापीठाची कार्यकारी परिषद ही, या अधिनियमातील उपबंधांशी सुसंगत राहून नवीन परिनियम तयार करील व ह्या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन महिन्यांच्या आत कुलपतींच्या मान्यतेसाठी ते सादर करील.

(२) कार्यकारी परिषदेस, या कलमात यानंतर तरतूद केलेल्या रीतीने वेळोवेळी परिनियम करता येतील किंवा त्यात सुधारणा करता येतील किंवा ते रद्द करता येतील.

(३) कार्यकारी परिषदेस, एकतर स्वतःहून किंवा कुलगुरूंनी प्रस्ताव केल्यावरून, परिनियमांचा मसुदा विचारात घेता येईल. परंतु, शैक्षणिक बाबींसंबंधातील कोणत्याही परिनियमांचा कार्यकारी परिषदेकडून विचार होण्यापूर्वी विद्या परिषदेकडून त्यांची तपासणी करण्यात येईल.

(४) कार्यकारी परिषदेने संमत केलेला प्रत्येक परिनियम कुलपतीस सादर करण्यात येईल व त्यास त्यावर आपली संमती देता येईल किंवा संमती रोखून ठेवता येईल किंवा फेरविचारासाठी तो कार्यकारी परिषदेकडे परत पाठविता येईल.

(५) कुलपती संमती देईपर्यंत कार्यकारी परिषदेने संमत केलेला कोणताही परिनियम वैध असणार नाही किंवा तो अमलात येणार नाही.

(६) या कलमात कांहीही असले तरी, कोणत्याही विद्यमान परिनियमात सुधारणा करणे किंवा नवीन परिनियम करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत होईल तर, राज्य शासनाला कुलपतीच्या सहमतीने, अशा परिनियमात सुधारणा करता येईल किंवा नवीन परिनियम करता येईल व तो **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करता येईल.

विनियम. ३९. (१) कार्यकारी परिषद, विद्यापरिषद आणि विद्याशाखा यांना, ह्या अधिनियम व त्या अन्वये करण्यात आलेले परिनियम यांच्याशी सुसंगत असतील असे पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसंबंधी विनियम करता येतील :—

(अ) त्यांच्या सभांमध्ये (गणपूर्तीसाठी आवश्यक असलेली संख्या धरून) अनुसरावयाची आणि त्यांचे कामकाज चालविण्याची कार्यपद्धती;

(ब) हा अधिनियम किंवा परिनियम यांनुसार ज्या बाबींची विनियमाद्वारे तरतूद करणे आवश्यक असेल अशा बाबींची तरतूद;

(क) केवळ अशा प्राधिकरणांशी संबंधित असतील अशा सर्व बाबींची किंवा अशा प्राधिकरणाच्या मते या अधिनियमान्वये किंवा परिनियमान्वये त्यांच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी ज्या बाबींची तरतूद करणे आवश्यक असेल अशा बाबींची तरतूद.

(२) विद्यापीठाचे प्रत्येक प्राधिकरण, उक्त प्राधिकरणाच्या सदस्यांना सभांच्या तारखांबद्दल आणि सभांमध्ये चालविण्यात येईल अशा कामकाजाबद्दल नोटीस देण्याची आणि सभांच्या कामकाजाचे अभिलेख ठेवण्याची तरतूद करणारे विनियम करील.

(३) विद्यापरिषदेस, परिनियमांच्या उपबंधास आणि कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, विद्यापीठाचे अभ्यासक्रम, परीक्षांची पद्धत व विद्यापीठाच्या पदव्या व पदविका यांसाठी संबंधित विद्याशाखे-कडून त्याचे मसुदे मिळाल्यानंतर तरतूद करण्यासाठी विनियम करता येतील.

(४) कार्यकारी परिषदेस, विद्याशाखेकडून मिळालेल्या विनियमांच्या कोणत्याही मसुद्यास, कोणत्याही, फेरबदलासह किंवा त्याशिवाय, मान्यता देता येईल किंवा तो नाकारता येईल किंवा अधिक विचार विनि-मयांसाठी म्हणून विद्यापरिषदेच्या सूचनांसह, तो, विद्याशाखेकडे परत पाठवता येईल.

(५) कार्यकारी परिषदेस, ती विनिर्दिष्ट करील अशा रीतीने, या कलमान्वये कोणत्याही प्राधिकरणाने केलेल्या कोणत्याही विनियमात सुधारणा करण्याबद्दल किंवा अशा कोणत्याही विनियमाच्या विलोपनाबद्दल निदेश देता येईल ; तथापि, अशा कोणत्याही सुधारणेमुळे किंवा विलोपनामुळे, उक्त विनियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## प्रकरण ७

### संलग्नीकरण व मान्यता

महाविद्यालयांचे व परिसंस्थांचे संलग्नीकरण.

४०. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कृषि विषयातील पदवीच्या किंवा पदविकेच्या स्तरापर्यंतचे शिक्षण देणारे विद्यापीठ अधिक्षेत्रातील कोणतेही महाविद्यालय किंवा इतर शैक्षणिक संस्था, या अधिनियमान्वये त्या क्षेत्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या विद्यापीठाखेरीज इतर कोणत्याही विद्यापीठाशी कोणत्याही प्रकारे सहयोगी होणार नाही किंवा कोणत्याही विद्यापीठाचा कोणताही विशेषाधिकार मिळवण्याचा प्रयत्न करणार नाही.

(२) कोणत्याही संलग्न महाविद्यालयास, घटक महाविद्यालय व्हावयाचे असेल त्याबाबतीत, त्या महाविद्यालयाने, कोणत्याही असल्यास, अटी व शर्तीसह, कुलसचिवाकडे आवेदनपत्र पाठविल अशा अर्जाचा कार्यकारी परिषद विचार करील व अशी परिषद, असा अर्ज मंजूर किंवा नामंजूर करावा किंवा कसे याविषयी आणि असा अर्ज, महाविद्यालय व विद्यापीठ आपसात कबूल होतील अशा ज्या अटी व शर्ती यांस अधीन ठेवून मंजूर करावयाचा असेल त्या अटी व शर्ती याविषयी राज्य शासनाकडे शिफारस करील. राज्य शासनास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, कार्यकारी परिषदेने शिफारस केलेल्या अटी व शर्ती यांत जे फेरफार करणे त्यास आवश्यक वाटेल अशा, कोणत्याही असल्यास, फेरफारांस अधीन ठेवून, अर्ज मंजूर किंवा नामंजूर करता येईल. अर्ज मंजूर करण्यात आला तर, असे महाविद्यालय हे घटक महाविद्यालय होईल आणि राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्याबाबतीत निर्दिष्ट करील अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी, ते, विद्यापीठाच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनाखाली येईल.

संशोधन व विशेषीकृत अभ्यास संस्थांना व निम्न कृषि शिक्षण संस्थांना मान्यता.

४१. (१) कार्यकारी परिषदेस, प्रगत पदव्यांसंबंधातील विद्यापीठाच्या गरजा अंशत: पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास संस्थांना, शिक्षणाची व संशोधनाची सोय करणाऱ्या संस्था म्हणून, मान्यता देण्याचा अधिकार असेल.

(२) ह्या कलमान्वये मान्यता मिळण्यासाठी अर्ज करणारी संस्था, आपले आवेदनपत्र, कुलसचिवाकडे पाठवील आणि अशा पत्रात पुढील बाबींसंबंधी संपूर्ण माहिती देण्यात येईल :—

(अ) व्यवस्थापक मंडळाची रचना व त्यातील कर्मचारीवर्ग;

(ब) ज्या विषयांच्या व पाठ्यक्रमांच्या संबंधात मान्यता मिळवावयाची असेल ते विषय व पाठ्यक्रम;

(क) जागा, साधनसामग्री व ज्यांची सोय करण्यात आली असेल अशा किंवा सोय करण्याचे योजिले असेल अशा विद्यार्थ्यांची संख्या;

(ड) कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांच्या अर्हता व वेतने आणि त्यांनी केलेले संशोधन कार्य;

(ई) आकारण्यात येणारी किंवा आकारण्याचे योजिलेली फी आणि इमारती, जमीन व साधन-सामग्री यांवरील भांडवली खर्चासाठी व संस्था सातत्याने चालू राहण्यासाठी व तिच्या कार्यक्षम कामका-जासाठी केलेली वित्तीय तरतूद.

(३) पोट-कलम (२) अन्वये पाठविलेले पत्र मिळाल्यावर, कार्यकारी परिषद,—

(अ) याबाबत तिने प्राधिकृत केलेल्या सक्षम व्यक्तीने त्या ठिकाणी जाऊन चौकशी करावी असा निदेश देईल ;

(ब) तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करील ;

(क) असा अर्ज पूर्णतः किंवा अंशतः मंजूर किंवा नामंजूर करण्यात यावा या प्रश्नावर विद्या-परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, खंड (अ) व (ब) अन्वये केलेल्या कोणत्याही चौकशीचे निष्कर्ष नमूद करून आपल्या मताची नोंद करील.

(४) कार्यकारी परिषदेस, विद्यापीठाखेरीज कोणत्याही प्राधिकरणाच्या व्यवस्थापनाखालील निम्न कृषि शाळा किंवा ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र या सारख्या कृषिविषयक शिक्षण देणाऱ्या कोणत्याही परिसंस्थेला कृषि व संलग्न कामे यासंबंधातील निम्नस्तर शिक्षणाच्या सोयी पुरवण्याच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त संस्था म्हणून, मान्यता देण्याचा अधिकार असेल. संशोधनाच्या अथवा विशेषीकृत अभ्यासाच्या कोणत्याही परिसंस्थेने मान्यता मिळण्यासाठी अर्ज करणे आणि तिला मान्यता देणे अथवा मान्यता देण्याचे नाकारणे यासंबंधी पोट-कलम (२) व (३) यात विहित केलेली कार्यवाही ही, योग्य त्या फेरफारांसह, निम्न कृषि शिक्षणाच्या कोणत्याही परिसंस्थेने मान्यता मिळण्यासाठी अर्ज करणे व तिला मान्यता देणे अथवा मान्यता देण्याचे नाकारणे यासाठी लागू असेल.

**महाविद्यालयांची व परिसंस्थांची तपासणी व अहवाल.**

४२. (१) विद्यापीठाच्या गरजांच्या अनुषंगाने, एखाद्या महाविद्यालयाची किंवा परिसंस्थेची कार्य-क्षमता व आवश्यकता अजमावणे शक्य व्हावे यासाठी आवश्यक वाटतील असे अहवाल, विवरणपत्रे आणि इतर माहिती, प्रत्येक महाविद्यालय व परिसंस्था कार्यकारी परिषदेस पुरविल.

(२) कार्यकारी परिषद, याबाबतीत ती प्राधिकृत करील अशा एक किंवा अधिक सक्षम व्यक्तींकडून वेळोवेळी, अशा प्रत्येक महाविद्यालयाची किंवा परिसंस्थेची तपासणी करवील.

(३) कार्यकारी परिषदेस, निकटपूर्वीच्या दोन कलमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात, तिला आवश्यक वाटेल अशी कारवाई, निर्दिष्ट केलेल्या मुदतीत करण्याबद्दल, कोणत्याही संलग्न महाविद्या-लयास किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेस फर्मावता येईल.

**संलग्नीकरण काढून घेणे.**

४३. (१) एखाद्या महाविद्यालयाने, कलम ४०, पोट-कलम (२) च्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यास कसूर केली असेल किंवा त्याच्या संलग्नीकरणाच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यास कसूर केली असेल किंवा कृषि शिक्षणाच्या हितसंबंधास बाध येईल अशा रीतीने ते महाविद्याल चालविण्यात येत असेल तर, संलग्नीकरणामुळे अशा महाविद्यालयास प्रदान करण्यात आलेले अधिकार, संपूर्णतः किंवा अंशतः काढून घेता येतील किंवा त्यात फेरफार करता येतील.

(२) असे अधिकार काढून घेण्याचा किंवा त्यात फेरफार करण्याचा प्रस्ताव, फक्त विद्यापरिषदेत प्रथम मांडण्यात येईल. असा प्रस्ताव मांडण्याचा इरादा असलेला परिषदेचा सदस्य, त्याबद्दल नोटीस देईल आणि ज्या कारणांसाठी तो मांडण्यात आला असेल ती कारणे लेखी नमूद करील.

(३) उक्त प्रस्ताव विचारात घेण्यापूर्वी, विद्यापरिषद, पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या नोटिशीची व लेखी निवेदनाची प्रत संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यास पाठवील व त्यासोबत, अशी सूचना पाठवील की, तीत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत महाविद्यालयाच्या वतीने सादर केलेले लेखी अभिवेदन विद्यापरिषद विचारात घेईल :

परंतु, अशा रीतीने निर्दिष्ट केलेली मुदत, आवश्यक वाटल्यास, विद्यापरिषदेस वाढविता येईल.

(४) अभिवेदन मिळाल्यावर किंवा पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेली मुदत संपल्यावर ; विद्यापरिषद, प्रस्तावाची नोटीस, निवेदन व अभिवेदन यांचा विचार केल्यानंतर आणि विद्या-परिषदेने त्याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून त्यास आवश्यक वाटेल अशी तपासणी केल्यानंतर, त्याबाबतीत करावयाच्या कार्यवाहीचा विचार करील ; संलग्नीकरण संपूर्णतः किंवा अंशतः काढून घेण्यासाठी कार्यवाही करावी असे विद्यापरिषद ठरवील तर, ती, त्या प्रयोजनार्थ ठराव संमत करील व त्यामध्ये, संलग्नीकरण काढून घेण्यासाठीची कारणे नमूद करील आणि त्या अर्थाची शिफारस, कार्यकारी परिषदेला करण्यात येईल.

(५) विद्यापरिषदेकडून अशी शिफारस करण्यात आल्यानंतर, कार्यकारी परिषदेला, तिला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, संलग्नीकरण काढून घ्यावे किंवा घेऊ नये आणि ते पूर्णपणे की अंशत: काढून घेण्यात यावे त्याबाबत निर्णय घेता येईल."

मान्यता काढून घेणे.

४४. (१) एखाद्या संस्थेने तिच्या मान्यतेच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर केली असेल किंवा कृषि शिक्षण किंवा संशोधन यांच्या हितसंबंधास बाध येईल अशा रीतीने संस्था चालविण्यात येत असेल तर मान्यतेमुळे अशा संस्थेस देण्यात आलेले अधिकार कार्यकारी परिषदेस काढून घेता येतील किंवा कोणत्याही मुदतीपर्यंत निलंबित करता येतील.

(२) अशा रीतीने अधिकार काढून घेण्याचा किंवा निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव, विद्यापरिषदेतच प्रथम मांडण्यात येईल. असा प्रस्ताव मांडण्याचा इरादा असलेला विद्यापरिषदेचा सदस्य त्याबद्दल नोटीस देईल आणि ज्या कारणांमुळे तो मांडण्यात आला असेल ती कारणे लेखी नमूद करील.

(३) उक्त प्रस्ताव विचारात घेण्यापूर्वी, विद्यापरिषद पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या नोटिशीची व लेखी निवेदनाची प्रत, संबंधित संस्थेच्या प्रमुखास पाठवील व त्यासोबत, सूचनेत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत संस्थेच्या वतीने सादर केलेले कोणतेही लेखी अभिवेदन विद्यापरिषद विचारात घेईल अशी सूचना पाठवील:

परंतु अशा रीतीने निर्दिष्ट केलेली मुदत, आवश्यक वाटल्यास विद्यापरिषदेस वाढविता येईल.

(४) अभिवेदन मिळाल्यावर किंवा पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेली मुदत संपल्यावर, विद्यापरिषद प्रस्तावाची नोटीस, निवेदन आणि अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्या बाबतीत करावयाच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेईल, विद्यापरिषदेने, मान्यता काढून घेण्याची किंवा निलंबित करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे ठरवल्यास, विद्यापरिषद त्या प्रयोजनासाठी एक ठराव मंजूर करील आणि त्यात ज्या कारणांसाठी अशी मान्यता काढून घेण्यात किंवा निलंबित करण्यात यावयाचे असेल ती कारणे नमूद करील, आणि कार्यकारी परिषदेला तशा अर्थाची शिफारस करील.

(५) विद्यापरिषदेने केलेली अशी शिफारस मिळाल्यावर कार्यकारी परिषद, तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, मान्यता काढून घेण्यात यावी किंवा विनिर्दिष्ट मुदतीसाठी निलंबित करण्यात यावी याबाबतचा निर्णय घेईल."

## प्रकरण ८

## अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण

विद्यापीठाची महाविद्यालये व इतर परिसंस्था.

४५. (१) विद्यापीठ आपल्या मुख्यालयाच्या ठिकाणी जवळच विद्यापीठ क्षेत्रात पुढील महाविद्यालये व अशा इतर परिसंस्था यांची व त्याच्याजवळ मुलभूत आणि उपयोजित संशोधनासाठी एका मध्यवर्ती प्रयोग केंद्राची स्थापना करील :—

(एक) कृषि महाविद्यालय (कृषि, अर्थशास्त्र व पशुसंवर्धन यांसह),
(दोन) पशुवैद्यक महाविद्यालय,
(तीन) कृषि तंत्रशास्त्र महाविद्यालय,
(चार) कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय,
(पाच) गृहविज्ञान महाविद्यालय,
(सहा) मूलविज्ञान व मानवविज्ञान महाविद्यालये,
(सात) स्नातकोत्तर अभ्यास परिसंस्था.

(२) विद्यापीठ क्षेत्राशिवाय विद्यापीठ ठरवील अशा विद्यापीठाच्या अधिक्षेत्रातील कोणत्याही भागातील महाविद्यालये, परिसंस्था यात किंवा इतर ठिकाणी विद्यापीठाचा कार्यक्रम पार पाडता येईल.

(३) विद्यापीठ स्नातकपूर्व व त्याचप्रमाणे स्नातकोत्तर प्रशिक्षणाची तरतूद करील व महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमाचे क्रमश: एकात्मीकरण केले जाऊन अध्यापन व संशोधन यांच्या खर्चासंबंधात काटकसर होईल आणि कार्यक्षमता राखली जाईल याबद्दल खात्री करून घेईल.

(४) स्नातकोत्तर अध्यापन व संशोधन शक्यतोवर स्नातकोत्तर अभ्यास परिसंस्थेच्या ठिकाणीच करण्यात येईल.

**विद्यापीठाच्या विद्याविषयक कर्मचारी-वर्गाचे सदस्य.**

४६. विद्यापीठाच्या विद्याविषयक कर्मचारीवर्गाचा प्रत्येक सदस्य, त्याच्या अर्हता व विद्यापीठातील त्याचा दर्जा याच्याशी सुसंवादी असे प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, अधि-व्याख्याता किंवा प्रयोगनिर्देशक हे पद किंवा इतर कोणतेही विहित पद धारण करील; मग त्या त्या वेळी त्यास नेमून देण्यात आलेली अध्यापन संशोधन किंवा विस्तार शिक्षण यासंबंधातील कर्तव्ये कोणतीही असोत.

**अध्यापन कार्यक्रम.**

४७. (१) विद्यापीठ वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे विद्यापीठाची घटक व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या अध्यापनाचे स्वरूप व रचना सारखीच असेल.

(२) निरनिराळ्या विद्याशाखांच्या गरजा भागविण्याकरिता विद्यापीठ, गरजेनुसार जादा महाविद्यालये व परिसंस्था स्थापन करील.

(३) विद्यापीठ, गरजेनुसार जादा प्रशिक्षण केंद्रे चालू करील किंवा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही प्रशिक्षण संस्था किंवा वर्ग कायमचे किंवा तात्पुरते बंद करील.

**संशोधन कार्यक्रम.**

४८. (१) विद्यापीठ, संशोधन सेवा स्थापन करील. विद्यापीठाची संशोधन व प्रयोग केंद्रे विद्यापीठास योग्य वाटेल अशा रीतीने आणि असे योग्य ते फेरबदल करून, विद्यापीठाकडून, त्याच्या घटक संशोधन संस्था म्हणून चालविण्यात येतील.

(२) विद्यापीठ विद्यमान कृषि महाविद्यालयांच्या ठिकाणी विभागीय संशोधन केंद्रे स्थापन करील आणि विद्यापीठ अधिक्षेत्रातील योग्य त्या ठिकाणी मूलभूत व उपयोजित अशा दोन्ही प्रकारच्या संशोधनासाठी विद्यापीठास योग्य वाटेल अशी जादा प्रयोग केंद्रे स्थापन करील.

(३) विद्यापीठास कोणत्याही वेळी त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे संशोधन केंद्रांपैकी कोणतेही संशोधन केंद्र कायमचे किंवा तात्पुरते बंद करता येईल, त्यात कपात करता येईल किंवा त्याचा विस्तार करता येईल.

**विस्तार शिक्षण कार्यक्रम.**

४९. विद्यापीठ, कृषि विस्तार शिक्षण सेवा स्थापन करील आणि या अधिनियमाच्या आणि परिनियमाच्या उपबंधास अधीन राहून संशोधनाच्या निष्कर्षावर आधारित असलेली उपयुक्त माहिती ग्रामीण क्षेत्रातील शेतकऱ्यांना व इतर लोकांना त्यांच्या समस्या सोडविण्यास सहाय्य करण्यासाठी, उपलब्ध करून देईल. विद्यमान कृषि महाविद्यालयांच्या ठिकाणी प्रादेशिक विस्तार शिक्षण पथके स्थापन करून, विद्यार्थी, विस्तार कार्यकर्ते, शेतकरी आणि इतर ग्रामीण लोक यांच्या फायद्यासाठी प्रात्यक्षिके व प्रशिक्षण कार्यक्रम चालवील. कृषि उत्पादन वाढविणे हा सर्व विस्तार कार्याचा मुख्य उद्देश राहील आणि या कार्याचा विद्यापीठाच्या आणि विद्यापीठ अधिक्षेत्रातील इतर समुचित अभिकरणांच्या इतर कार्याशी समन्वय करण्यात येईल.

**अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांचे समन्वयन आणि कार्य व अभ्यासक्रम आणि सेवा यांचे एकत्रीकरण.**

५०. (१) विद्यापीठाच्या समुचित अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून, कुलगुरू, विद्यापीठाचे अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण कार्य यांच्या पूर्ण समन्वयासाठी, आवश्यक असेल अशी उपाययोजना करण्यास जबाबदार असेल.

(२) विद्यापीठाचे समुचित अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्यामार्फत काम करीत असताना, कुलगुरू, कृषिविज्ञानाशी ज्यांचा संबंध येत असेल असे सृष्टिविज्ञान, भौतिक विज्ञान व समाजविज्ञान यातील नवीन माहिती व तंत्र विज्ञान यांच्या विकासात ज्याद्वारे शक्य तितकी जास्तीत जास्त प्रगती होऊ शकेल अशी परिस्थिती निर्माण होते आहे याची खात्री करण्यास व त्यांचे अध्यापन अभ्यास क्रमाकडे व विद्यापीठ अधिक्षेत्रामध्ये जेथे व्यवहारात त्यांचा उपयोग करता येण्याजोगा असेल तेथे त्यांचे आकलन व अंगीकार व्हावा यासाठी असलेल्या शैक्षणिक कार्यक्रमात अंतर्भाव करण्यास जबाबदार असेल.

(३) विद्यापीठाचे समुचित अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्यामार्फत काम करीत असताना कुलगुरू विद्यापीठाच्या विद्याशाखांमधील कार्याची, अनावश्यक पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पाठ्यक्रम पुरविण्यासाठी व विद्यापीठाची द्रव्यसाधने व प्रज्ञा यांद्वारे शक्य असेल तेथवर विद्याशाखांमध्ये संपर्क साधण्यासाठी विद्यापीठाच्या निरनिराळ्या विद्याशाखांमध्ये देण्यात येणारे पाठ्यक्रम व अभ्यासक्रम यांच्यामध्ये समुचित असे परस्परसंबंध सुनिश्चित करण्यास जबाबदार असेल.

(४) राज्याच्या गरजा लक्षात घेऊन, विद्यापीठ त्यांच्या संशोधनाच्या आणि विस्तार शिक्षणाच्या कार्यक्रमाचा विकास करील आणि कृषि विकास कार्यात गुंतलेल्या राज्य शासनाच्या विभागास योग्य तो तांत्रिक पाठिंबा आणि संमंत्रक सल्ला देईल.

## प्रकरण ९

### वित्तव्यवस्था

५१. (१) विद्यापीठ, विद्यापीठ निधी या नावाचा एक निधी प्रस्थापित करील. विद्यापीठ निधी.

(२) पुढील रकमा विद्यापीठ निधीचा भाग म्हणून असतील किंवा त्या विद्यापीठ निधीच्या खाती जमा करण्यात येतील :—

(अ) शासनाने दिलेले कोणतेही अंशदान किंवा अनुदान;

(ब) फी व आकार यांपासून येणारे उत्पन्न धरून, सर्व साधनांपासून येणारे विद्यापीठाचे उत्पन्न व शेती उत्पादनाच्या विक्रीचे उत्पन्न;

(क) विद्यापीठास मिळालेल्या कोणत्याही मृत्युपत्रित देणग्या, देणग्या, दाने आणि इतर अनुदाने.

(३) राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीने, विद्यापीठ निधीचा कोणताही भाग वेळोवेळी विद्यापीठ, विद्यापीठाच्या लेख्यांत वेगळ्या शीर्षाखाली जमा करील. परंतु, अशा रीतीने ज्या उद्दिष्टासाठी विशेष निधी उभारण्यात आला असेल त्याच्याशी स्पष्टपणे संबंधित असतील अशा रकमा अशा विशेष शीर्षाखाली जमा किंवा खर्च खाती टाकण्यात येतील.

(४) विद्यापीठ निधी हा, कार्यकारी परिषदेच्या स्वेच्छानिर्णयानुसार, स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये
१९३४ किंवा भारताच्या रिझर्व्ह बँकेबाबत अधिनियम, १९३४ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेली कोणत्याही
चा २. अनुसूचीत बँकाच्या नियमताबाबत अधिनियम, १९४९ याचे कलम २२ अन्वये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
१९४९ दिलेली अनुज्ञप्ती धारण करीत असेल अशा बँकेत किंवा त्या प्रयोजनार्थ राज्य शासनाने
चा१०. मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत, ठेवण्यात येईल किंवा भारतीय विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १८८२
१८८२ अन्वये प्राधिकृत केलेल्या रोख्यांमध्ये किंवा पाच लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, विद्यापीठाच्या
चा २. किंवा कोणत्याही संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रयोजनांसाठी प्रस्थापित
करण्यात आलेल्या ग्राहक सहकारी संस्थांच्या शेअर्समध्ये किंवा त्यांना कर्जे देऊन, गुंतविण्यात येईल.

५२. (१) विद्यापीठ, राज्य शासन निश्चित करील अशा रीतीने, विद्यापीठाच्या जमा रकमा व खर्च यांचे वार्षिक वित्तीय अंदाज तयार करील. वित्तीय अंदाज.

(२) कार्यकारी परिषद अशा रीतीने तयार केलेले अंदाज विचारात घेईल आणि ते फेरफारांसह किंवा फेरफारावाचून, मान्य करील.

(३) विद्यापीठ, कार्यकारी परिषदेने मान्य केलेले असे अंदाज त्यांच्या मंजुरीसाठी, राज्य परिषदेकडून विद्यापीठास अधिसूचित करण्यात येईल अशा तारखेला राज्य परिषदेस सादर करील.

(४) राज्य परिषदेस, उक्त अंदाजाच्या संबंधात, तिला योग्य वाटतील असे आदेश देता येतील आणि ते विद्यापीठास कळविता येतील व विद्यापीठ अशा आदेशांची अंमलबजावणी करील.

(५) विद्यापीठाचे वित्तीय अंदाज आणि लेखा विवरण तयार करण्यासाठी नियंत्रक जबाबदार राहील.

**दिलेल्या अनुदानासंबंधीची विवरणपत्रे, विवरणे इत्यादी शासनाला सादर करणे.**

५३. विद्यापीठ, राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अनुदानासंबंधात, राज्य शासन वेळोवेळी फर्मावील अशी विवरणपत्रे, विवरणे, लेखे, अहवाल आणि इतर माहिती राज्य शासनाला सादर करील आणि राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशा मुदतीत आणि अशा रीतीने, राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अनुदानांच्या वापरासंबंधात, राज्यशासन निदेश देईल अशी कार्यवाही करील आणि अशी आणखी विवरणपत्रे, विवरणे, लेखे, अहवाल किंवा इतर माहिती सादर करील.

**शासनाचे वित्तीय नियंत्रण.**

५४. राज्य शासनाच्या किंवा त्याने याबाबतीत प्राधिकार दिलेल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय, विद्यापीठ—

(अ) कलम १४ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे "इतर अधिकाऱ्यांची" किंवा विभागप्रमुखाची किंवा प्राध्यापकांची किंवा तत्सम हुद्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यांची कोणतीही नवीन पदे निर्माण करणार नाही;

(ब) अध्यापन व अध्यापकेतर प्रवर्गातील कोणत्याही अधिकाऱ्यांचे व इतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवानिवृत्ती नंतरचे व इतर लाभ यांत फेरफार करणार नाही; किंवा

(क) सानुग्रह प्रदान, शिष्यवृत्त्यांच्या दरातील वाढ आणि कोणत्याही अशा अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना दिले जाणारे वित्तीय गुंतवणूक असणारे इतर लाभ यांसह, कोणतेही विशेष वेतन, भत्ता आणि कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त परिश्रमिक देणार नाही.

**लेखे व लेखा-परीक्षा.**

५५. (१) विद्यापीठाचे वार्षिक लेखे कुलगुरूच्या निदेशाखाली नियंत्रकाकडून तयार करण्यात येतील व विद्यापीठाला कोणत्याही साधनाद्वारे उपार्जित होणारा व मिळणारा सर्व पैसा आणि विद्यापीठाने संवितरित केलेल्या व दिलेल्या सर्व रकमा यांची लेख्यामध्ये नोंद करण्यात येईल.

(२) कुलगुरू वार्षिक लेखे आणि ताळेबंद राज्य शासनाला सादर करील व राज्य शासन ते नियुक्त करील अशा लेखापरीक्षकाकडून त्यांची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील. लेखापरीक्षा करण्यात आल्यावर उक्त लेखे मुद्रित करण्यात येतील आणि लेखापरीक्षेच्या अहवालाच्या प्रतीसह त्यांच्या प्रती कुलगुरू कार्यकारी परिषदेला, प्रति-कुलपतीला व कुलपतीला लेखापरीक्षा केलेले लेखे ज्या तारखेस कुलगुरूस मिळतील त्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत सादर करील.

(३) कार्यकारी परिषद, लेख्यांची एक प्रत व लेखापरीक्षेचे अहवाल राज्य शासनास, वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून नऊ महिन्यांच्या आत सादर करील आणि राज्य शासन ते राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

(४) कार्यकारी परिषद, पोट-कलम (३) मध्ये निर्देशिलेले लेखे व लेखापरीक्षा अहवालाची प्रती याबरोबरच दरवर्षी, राज्य शासनास, विद्यापीठाद्वारे अगोदरच्या लेखापरीक्षा अहवालातील ज्यावर कार्यवाही करण्यात आली आहे, ज्यावरील कार्यवाहीस प्रारंभ करण्यात आलेला आहे आणि ज्यांवरील कार्यवाहीस अद्याप प्रारंभ केलेला नाही अशा बाबींची संख्या दर्शविणारे विवरणपत्रही सादर करील.

**लेखे ठेवण्यासाठी निदेश.**

५६. विवक्षित अशा विशिष्ट कार्याशी संबंधित लेखे कोणत्या पद्धतीने ठेवण्यात यावेत याविषयी प्रत्येक विद्यापीठास निदेश देण्यास राज्य शासन सक्षम असेल आणि विद्यापीठ, राज्य शासनाने दिलेल्या निदेशांनुसार कार्यवाही करील.

## प्रकरण १०

### संकीर्ण उपबंध

५७. (१) या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार अन्यथा जी तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय, प्रत्येक विद्यापीठाच्या प्रत्येक वेतनी अधिकाऱ्याची व विद्याविषयक कर्मचारीवर्गातील व्यक्तींची नेमणूक लेखी करारान्वये करण्यात येईल. उक्त करार, कुलसचिवाकडे ठेवण्यात यईल व त्याची एक प्रत, संबंधित कर्मचाऱ्यास देण्यात येईल. विवक्षित नेमणुका कराराधीन असणे.

(२) अशा कोणत्याही कर्मचाऱ्यास विद्यापीठातील किंवा विद्यापीठाबाहेरील कोणत्याही कामाकरिता, परिनियमान्वये तरतूद करण्यात येईल त्या व्यतिरिक्त, कोणतेही पारिश्रमिक मिळणार नाही.

(३) विद्यापीठ व त्याचा कोणताही कर्मचारी, यांच्यामधील करारातून उद्‌भवणारा कोणताही विवाद, संबंधित कर्मचाऱ्याने विनंती केली असता, लवादी न्यायाधिकरणाकडे पाठविण्यात येईल; असे न्यायाधिकरण, कार्यकारी परिषदेने नेमलेला एक सदस्य, संबंधित कर्मचाऱ्याने नामनिर्दिष्ट केलेला एक सदस्य आणि कुलपतीने नेमलेला एक पंच यांचे मिळून होईल. न्यायधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि न्यायाधिकरणाने ज्याबाबत निर्णय दिला असेल अशा बाबीसंबंधात कोणत्याही दिवाणी न्यायालयात कोणताही दावा दाखल करता येणार नाही. अशी प्रत्येक विनंती ही, लवादाबाबत अधिनियम, १९४० याच्या अर्थानुसार, ह्या कलमाच्या अटीवर लवादासाठी अधीन असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त अधिनियमाचे उपबंध त्याप्रमाणे लागू होतील. १९४० चा १०.

१ (स्थापन करण्यात येणाऱ्या निवड समितीच्या शिफारशीनुसार)

५८. (१) याबाबतीत करण्यात आलेल्या परिनियमांच्या उपबंधानुसार त्या प्रयोजनासाठी रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून असेल त्याशिवाय, विद्यापीठान कोणत्याही ~~व्यक्तीची विद्याविषयक~~ कर्मचारीवर्गातील व्यक्ती म्हणून नेमणूक करता कामा नये : निवड समितीच्या शिफारशीं-

करण्यास बदल;

Slip 'A'

२ ~~(क) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—~~

"(३) राज्यपरिषदेचा अध्यक्ष हा निवड समितीचा सभापती म्हणून काम पाहील. अध्यक्षाच्या अनुपस्थित किंवा अध्यक्षाचे पद रिकामे असेल त्याबाबतीत, राज्यपरिषदेच्या अध्यक्षाकडून नामनिर्देशित करण्यात येणारा निवड समितीचा एक सदस्य, निवड समितीचा सभापती म्हणून काम पाहील.".

~~७. मूळ अधिनियमाच्या कलम ५९ मध्ये, "प्राध्यापकापेक्षा" या शब्दाने सुरू होणाऱ्या व ... १९८३~~

(तीन) राज्यातील कृषि विद्यापीठांच्या कार्यकारी परिषदांच्या अशासकीय सदस्यांमधून प्रति कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा एक अशासकीय सदस्य;

(चार) कुलपतीने नामनिर्देशित करावयाचे दोन तज्ञ;

(पाच) राज्य शासनाने, नेमावयाचे भारतीय कृषि संशोधन परिषदेचे दोन प्रतिनिधी. यापैकी एक सदस्य, ज्या विशिष्ट क्षेत्रासाठी सेवा भरती करावयाची असेल त्या क्षेत्रातील विशेषज्ञ असेल.

३ ५९. एका विद्यापीठातील विद्याविषयक कर्मचाऱ्यांची आणि अधिकाऱ्यांची विशेष बुद्धिमत्ता आणि ज्ञान अन्य विद्यापीठास उपलब्ध करून देण्याच्यादृष्टीने, विद्याविषयक कर्मचारीवर्गातील कोणाही सदस्यांची आणि ~~प्राध्यापकापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या कोणाही अधिकाऱ्याची म्हणजच कोणत्याही प्राध्यापकांची, विभाग प्रमुखांची, सहयोगी अधिष्ठात्याची, अधिष्ठात्याची किंवा संचालकांची,~~ एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठात बदली करण्यास प्रति-कुलपति सक्षम असेल अशा प्रत्येक प्रकरणी प्रति-कुलपतीला बदलीचा कालावधी निश्चित करता येईल. एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठामध्ये बदली झालेल्या व्यक्ती, आपापल्या पदांवरील आपला धारणाधिकार मूळ विद्यापीठात धारण करतील आणि जेथे त्यांची बदली झालेली असेल अशा विद्यापीठामध्ये त्यांनी पार पाडलेली सेवा, त्यांच्या मूळ विद्यापीठातील त्यांच्या सेवेतील वरिष्ठतेसाठी जमेस धरण्यात येईल. कर्मचारीवर्गाची एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठात बदली करणे.



१. सन १९८८ चा १२ याच्या कलम ६ (अ) मुळे मूळ ... [illegible] ... करण्यात आले.

विद्यापीठातील सेवा व पदे यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास-जमाती यासाठी विशेष तरतूद.

६०. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला, अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या व्यक्तींसाठी आणि इतर मागासवर्गाच्या व्यक्तींसाठी ज्या प्रवर्गातील पदे राखून ठेवण्यात येतील अशा पदांचे प्रवर्ग, त्यांच्याकरिता राखून ठेवावयाच्या पदांची टक्केवारी आणि अशा राखीव जागांशी संबंधित कोणत्याही अन्य बाबी यांच्या संबंधात, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश कोणत्याही विद्यापीठाला देण्याचा अधिकार असेल आणि विद्यापीठ अशा निदेशांचे पालन करील.

पद रिकामे होणे.

६१. (१) अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या कोणत्याही सदस्यास, कुलसचिवांमार्फत, कुलगुरुच्या नावे पत्र पाठवून, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि कुलगुरुने राजीनामा स्वीकारल्यावर अशा सदस्याचे पद रिकामे होईल:

परंतु, अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या कोणत्याही सदस्याची नियुक्ती किंवा नामनिर्देशन कुलपतिमार्फत करण्यात आले असेल त्याबाबतीत, अशा कोणत्याही सदस्यास, कुलपतीच्या नावे पत्र पाठवून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि कुलपतीने राजीनामा स्वीकारल्यावर तो अंमलात येईल व त्याचे पद रिकामे होईल.

(२) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा कोणताही सदस्य, ज्यात नैतिक अधःपाताचा अंतर्भाव होत असेल अशा अपराधाबद्दल न्यायालयाकडून त्यास दोषी ठरविण्यात आल्यावर, उक्त प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा सदस्य असण्याचे बंद होईल.

तात्पुरत्या रिकाम्या झालेल्या जागा भरणे.

६२. जेव्हा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त इतर सदस्याचे पद, अशा सदस्याच्या पदाची मुदत संपण्यापूर्वी, रिकामे होईल तेव्हा, असे रिकामे पद, सोईस्कर होईल तितक्या लवकर, एखाद्या सदस्याची यथास्थिती, निवडणुक, नामनिर्देशन, नेमणूक करून किंवा स्वीकृत करून ते भरण्यात येईल; आणि अशा सदस्याची ज्याच्या जागी निवडणूक, नामनिर्देशन, नेमणूक करून किंवा स्वीकृत करून घेण्यात आले असेल तो सदस्य जर उक्त पद रिकामे झाले नसते तर ज्या मुदतीपर्यंत त्या सदस्याने पद धारण केले असते त्या मुदतीपर्यंत पद धारण करील.

केवळ रचनेत दोष जागा रिकामी असणे इत्यादी मुळे प्राधिकरणाचे कृत्ये व कामकाज विधि अग्राह्य नसणे.

६३. कार्यकारी परिषद, किंवा विद्या परिषद किंवा विद्यापीठाचे इतर कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था यांची यथोचित रीत्या रचना करण्यात आलेली नसली किंवा त्यांच्या रचनेत किंवा पुनर्रचनेत कोणताही दोष असला तरी आणि अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या सदस्यांची जागा रिकामी असली तरी केवळ अशा कारणांवरून विद्यापीठाच्या अशा प्राधिकरणाचे किंवा संस्थेचे कोणतेही कृत्य किंवा कामकाज विधि अग्राह्य ठरणार नाही.

६४. या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही परिनियमाच्या किंवा विनियमाच्या कोणत्याही उप-बंधाच्या अर्थविवरणासंबंधी किंवा एखादी व्यक्ती, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा सदस्य म्हणून योग्य रीतीने नामनिर्देशित करण्यात, निवडण्यात, नेमण्यात, स्वीकृत करण्यात आली आहे किंवा असा सदस्य झाली आहे किंवा सदस्य होण्याचा तिला हक्क आहे किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न उद्भवेल तर, कुलगुरुस, उक्त बाब, तिचा प्रत्यक्ष परिणाम झालेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेने विनंती अर्ज केला असता किंवा स्वत: होऊन कुलपतीकडे पाठविता येईल आणि कुलपती संबंधित व्यक्तीस किंवा संस्थेस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्यास आवश्यक वाटेल असा सल्ला घेतल्यानंतर, उक्त प्रश्नाचा निर्णय करील व त्याचा निर्णय अंतिम असेल. अर्थविवरणा-संबंधातील प्रश्न व विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या रचने-संबंधातील विवाद.

६५. (१) कोणत्याही विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या संबंधातील शिस्त आणि शिस्तभंगाची कार्यवाही या बाबतीतील सर्व अधिकार, कुलगुरुकडे निहित असतील. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखणे.

(२) कुलगुरुस, आपल्या अधिकारांचा वापर करीत असताना, आदेशाद्वारे, कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा विद्यार्थ्यांना निष्कासित करण्यात यावे किंवा विनिर्दिष्ट मुदतीसाठी त्यास/त्यांना काढून टाकण्यात यावे, किंवा महाविद्यालयात, संस्थेत किंवा विद्यापीठाच्या विभागात एका किंवा अधिक पाठ्यक्रमांमध्ये, विनिर्दिष्ट मुदतीसाठी, प्रवेश देण्यात येऊ नये असा, किंवा तीनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात यावी असा, किंवा विद्यापीठ, महाविद्यालय, संस्था किंवा विभाग यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेस किंवा परीक्षांना बसण्यास, पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या विनिर्दिष्ट मुदतीसाठी मनाई करण्यात यावी, असा, किंवा तो विद्यार्थी ज्या परीक्षेला किंवा परीक्षांना बसला, असेल किंवा बसले असतील त्या एक किंवा अनेक परीक्षातील संबंधित विद्यार्थ्यांचा किंवा विद्यार्थ्यांचा निकाल पुढे ढकलण्यात यावा किंवा रद्द करण्यात यावा असा, निदेश देता येईल.

(३) कुलगुरुच्या अधिकारांस बाध न आणता महाविद्यालयांचे व संस्थेचे प्राचार्य आणि विद्या-पीठातील अध्यापन विभागांचे प्रमुख यांना, योग्य ती शिस्त राखण्यासाठी आवश्यक असेल त्यानुसार, त्यांच्या संबंधित प्रभाराखालील विद्यार्थ्यांच्या संबंधात असे अधिकार वापरण्याचा प्राधिकार असेल.

(४) कुलगुरु, कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची शिस्त व उचित वर्तणूक याबाबत नियम करील. हे नियम, सर्व महाविद्यालयांच्या व संस्थांच्या विद्यार्थ्यांना लागू असतील आणि प्रवेश देण्याच्या वेळी प्रत्येक विद्यार्थ्याला अशा नियमांची एक प्रत पुरविण्यात येईल.

(५) विद्यापीठातील प्रवेशाच्या वेळी, प्रत्येक विद्यार्थी, कुलगुरुची शिस्तविषयक अधिकारिता आपणास मान्य आहे आणि कुलगुरुनी त्या संदर्भात केलेल्या नियमांचे आपण पालन करू अशा अर्थाच्या प्रतिज्ञापनावर स्वाक्षरी करील.

(६) कुलगुरुची शिस्तविषयक अधिकारिता, विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या व विद्यापीठाने मान्यता दिलेल्या सर्व संस्थांच्या, विद्यार्थ्यांना लागू असेल.

६६. (१) विद्यापीठाचे हितसंबंध योग्य रीत्या जपण्यात आले आहेत याची खात्री करणे हे विद्यापीठाच्या प्रत्येक प्राधिकरणाचे व अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल. हानीसाठी प्राधिकरण व अधिकारी जबाबदार असणे.

(२) या अधिनियमाच्या किंवा परिनियमाच्या किंवा विनियमाच्या उपबंधांशी सुसंगत नसेल असे विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा अधिकाऱ्याच्या कोणत्याही कृत्यामुळे, ते सद्-भावनेने केले असेल त्याशिवाय, किंवा अधिनियम, परिनियम किंवा विनियम यास अनुसरून कृत्य करण्यात झालेल्या कोणत्याही कसुरीमुळे किंवा त्याने जाणूनबुजून दुर्लक्ष्य किंवा कसुरी केल्यामुळे, विद्यापिठाचे नुकसान किंवा हानी झाल्याचे आढळून आले तर ; असे नुकसान किंवा हानी, प्राधि-करणाकडून किंवा त्याच्या संबंधित सदस्यांकडून किंवा यथास्थिती, संबंधित अधिकाऱ्याकडून, परिनियमांद्वारे विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार, वसूल केले जाण्यास पात्र ठरेल.

**कृत्यांचे व आदेशांचे संरक्षण.** ६७. विद्यापीठाने किंवा त्याच्या कोणत्याही प्राधिकरणांनी, संस्थांनी किंवा अधिकाऱ्यांनी यथोचित रीत्या व सद्भावनापूर्वक केलेली सर्व कृत्ये व दिलेले सर्व आदेश हे अंतिम असतील; आणि त्यानुसार या अधिनियमास व त्या अन्वये करण्यात आलेल्या परिनियमास व विनियमास अनुसरून जे कृत्य करण्यात आल्याचे अभिप्रेत असेल किंवा सद्भावनापूर्वक केलेल्या अशा कोणत्याही कृत्याबद्दल विद्यापीठाविरुद्ध किंवा त्याच्या कोणत्याही प्राधिकरणाविरुद्ध, संस्थेविरुद्ध किंवा अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही किंवा त्याजकडून कोणत्याही नुकसानभरपाईची मागणी करण्यात येणार नाही.

**समित्यांची रचना.** ६८. ह्या अधिनियमान्वये किंवा परिनियमान्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणास कोणतीही समिती नियुक्त करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला असेल त्या बाबतीत, अशी समिती, अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय संबंधित प्राधिकरण प्रत्येक बाबतीत ठरवील त्याप्रमाणे, त्याच्या सदस्यांची किंवा अंशत: त्याचे सदस्य व अंशत: इतर व्यक्ती यांची मिळून होईल.

**वार्षिक अहवाल.** ६९. विद्यापीठाचा वार्षिक अहवाल हा कुलगुरुच्या निदेशान्वये तयार करण्यात येईल आणि तो विहित करण्यात येईल अशा तारखेस किंवा त्या पूर्वी त्यांच्याकडून कार्यकारी परिषदेला सादर करण्यात येईल. कार्यकारी परिषदेने मान्य केल्याप्रमाणे अहवाल कुलगुरुकडून कुलपतीला व राज्य शासनाला सादर करण्यात येईल. राज्य शासन, उक्त अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्याची व्यवस्था करील.

*

## प्रकरण ११

### निरसन व व्यावृत्ती

**निरसन व व्यावृत्ती.** ७०. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेला व त्यानंतर,—

(अ) महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७; — १९६७ चा महा. २३.

(ब) पंजाबराव कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६८; — १९६९ चा महा. ९.

(क) मराठवाडा कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२; — १९७२ चा महा. १७.

(ड) कोकण कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२; — १९७२ चा महा. १८.

* सन 2005 च्या कलम ११ अन्वये कलम ६९ नंतर नवीन प्रकरण समाविष्ट करण्यात येईल

निरसित झाले असल्याचे समजण्यात येईल.

(२) उक्त अधिनियमांचे निरसन करण्यात आले असले तरीही---

(एक) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी विद्यमान विद्यापीठातील कुलगुरुचे पद धारण करणारी व्यक्ती, अशा प्रारंभानंतर, संबंधित विद्यापीठाची कुलगुरु होईल आणि ती अशाप्रकारे पदावर राहिली असती तर कुलगुरु म्हणून तिचा पदावधी ज्यावेळी समाप्त झाला असता त्या वेळेपर्यंत किंवा मृत्यू, राजीनामा या कारणांमुळे किंवा अन्यथा, कुलगुरु म्हणून ती पदावर राहण्याचे समाप्त होत असेल तोपर्यंत, त्याच अटी व शर्तींवर ती उक्त पद धारण करण्याचे चालू ठेवील आणि या अधिनियमांद्वारे किंवा तदन्वये संबंधित विद्यापीठाच्या कुलगुरुला प्रदान करण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करील व सर्व कर्तव्ये पार पाडील ;

परंतु, मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुच्या बाबतीत, या अधिनियमाच्या प्रारंभानंतरही त्याला कुलपतीकडून देण्यात येईल अशा, त्याच्या नियुक्तीच्या तारखेपासून एकूण दोन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीच्या, पदावधीमधील कोणत्याही वाढीचा समावेश होईल ;

(दोन) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून कलम ३० अनुसार रचना करण्यात आलेली कार्यकारी परिषद तिची पहिली सभा घेईपर्यंत, पुढील सदस्यांचा समावेश असलेली कार्यकारी परिषद ही या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी रचना करण्यात आलेली कार्यकारी परिषद असल्याचे मानण्यात येईल ;

(अ) कुलगुरु---पदसिद्ध अध्यक्ष ;

(ब) कृषि संचालक किंवा कृषि संचालकाने प्रतिनियुक्त केलेला अतिरिक्त कृषि संचालक ;

(क) संचालक, पशुसंवर्धन किंवा संचालक, पशुसंवर्धन यांनी प्रतिनियुक्त केलेला सह संचालक, पशुसंवर्धन ;

(ड) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा विद्यापीठाचा एक संचालक ;

(ई) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा एक अधिष्ठाता ;

(फ) कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा एक कृषि वैज्ञानिक ;

(ग) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा एक प्रगतिशील शेतकरी ;

(ह) भारतीय कृषि संशोधन परिषदेचा एक प्रतिनिधी ;

(आय) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे महाराष्ट्र विधान सभेचे तीन सदस्य ;

(जे) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे महाराष्ट्र विधान परिषदेचे दोन सदस्य ;

(के) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा, विद्यापीठ क्षेत्रातील एका जिल्हा परिषदेच्या कृषि समितीचा सभापती ;

(एल) कुलसचिव, हा कार्यकारी परिषदेचा पदसिद्ध सचिव असेल ;

(तीन) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून, कलम ३३ च्या उपबंधानुसार रचना करण्यात आलेली विद्यापरिषद, आपली पहिली सभा होईपर्यंत, पुढील सदस्यांची मिळून झालेली विद्यापरिषद, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ रचना करण्यात आलेली विद्यापरिषद असल्याचे मानण्यात येईल :—

(अ) कुलगुरु—पदसिद्ध अध्यक्ष ;

(ब) शिक्षण संचालक ;

(क) संशोधन संचालक ;

(ड) संचालक, विस्तार शिक्षण ;

(ई) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचे ज्ञान शाखांचे दोन अधिष्ठाते ;

(फ) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचे दोन सहयोगी अधिष्ठाते ;

(ग) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचे संलग्न महाविद्यालयाचे व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे दोन प्राचार्य ;

(ह) कुलसचिव हा विद्यानपरिषदेचा पदसिद्ध सदस्य असेल.

(चार) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही विद्यमान विद्यापीठास संलग्न असणारी सर्व महाविद्यालये, त्यांची संलग्नता या अधिनियमान्वये संबंधित विद्यापीठाकडून काढून घेण्यात येईपर्यंत किंवा या अधिनियमान्वये त्यांचे घटक महाविद्यालयात रूपांतर करण्यात येईपर्यंत, यांपैकी अगोदरची असेल त्या मुदतीपर्यंत, संबंधित विद्यापीठाशी संलग्न असल्याचे मानण्यात येईल ;

(पाच) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाच्या कोणत्याही विशेषाधिकारांच्या हक्कदार असणाऱ्या इतर सर्व शैक्षणिक परिसंस्था, संबंधित विद्यापीठाच्या तशाच विशेषाधिकाराच्या हक्कदार असतील ;

(सहा) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाचे नोंदलेले किंवा नोंदण्यात आल्याचे मानलेले सर्व स्नातक हे संबंधित विद्यापीठाचे स्नातक म्हणून नोंदलेले असल्याचे मानण्यात येईल ;

(सात) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाची सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता आणि कोणत्याही प्रकारचे सर्व हक्क, हितसंबंध, अधिकार व विशेषाधिकार हे संबंधित विद्यापीठांकडे हस्तांतरित होतील आणि आणखी हस्तांतरणपत्राशिवाय त्याच्याकडे निहित होतील आणि त्यांचा विनियोग, ज्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनांसाठी संबंधित विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे त्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनांसाठी करण्यात येईल ;

(आठ) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, कोणत्याही विद्यमान विद्यापीठाने स्वीकारलेली किंवा त्याला मिळालेली व त्याने धारण केलेली सर्व धर्मदाने ही, या अधिनियमाखालील संबंधित विद्यापीठाने स्वीकरली असल्याचे, त्याला मिळाली असल्याचे किंवा त्याने धारण केली असल्याचे मानण्यात येईल आणि ज्या शर्तीवर अशी धर्मदाने स्वीकारली, मिळाली किंवा धारण केली असतील अशा सर्व शर्ती, त्या या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाशी विसंगत असल्या तरी, या अधिनियमान्वये वैध असल्याचे मानण्यात येईल ;

(नऊ) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निर्माण झालेली आणि प्रत्येक विद्यमान विद्यापीठाच्या नावे वैध रीत्या अस्तित्वात असलेली सर्व कर्जे, दायित्वे व बंधने यांची फेड व पूर्ती तत्संबंधीत विद्यापीठांकडून करण्यात येईल ;

(दहा) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी करण्यात आलेले व ज्यामध्ये विद्यमान विद्यापीठाच्या नावे असलेली कोणतीही मृत्यूपत्रित देणगी, दान, अटी किंवा न्यास अंतर्भूत आहे असे कोणतेही मृत्यूपत्र, विलेख किंवा इतर दस्तऐवज यांचा अर्थ, जणू काही त्यामध्ये विद्यमान विद्यापीठाऐवजी तत्संबंधित विद्यापीठाचे नाव आहे असे समजून लावण्यात येईल ;

(अकरा) कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा कोणत्याही अधिनियमितीखाली काढलेल्या कोणत्याही इतर विलेखामध्ये, विद्यमान विद्यापीठाच्या असलेल्या सर्व निर्देशांचा अर्थ, ते तत्संबंधित विद्यापीठाचे निर्देश असल्याप्रमाणे लावण्यात येईल ;

(बारा) या अधिनियमास प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वी कायदेशीररीत्या केलेली व अस्तित्वात असलेली कोणत्याही विद्यमान विद्यापीठाच्या कुलसचिवाची व इतर सर्व अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक, या अधिनियमान्वये व या अधिनियमाच्या प्रयोजनास्तव तत्संबंधित विद्यापीठासाठी करण्यात आल्याचे समजण्यात येईल ; आणि सक्षम प्राधिकरणाला जेथवर नेमणुका रद्द रकता येतील किंवा त्यांच्या शर्तींमध्ये बदल करता येतील तेथवर असेल त्याशिवाय, कुलसचिव आणि असे इतर अधिकारी व कर्मचारी पद किंवा सेवा धारण करण्याचे चालू ठेवतील ;

(तेरा) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाबाबतचे, निरसित केलेल्या अधिनियमांखालील सर्व परिनियम, ते या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात राहतील आणि या अधिनियमाखाली केलेल्या परिनियमांद्वारे त्यांचे अधिक्रमण करण्यात येईपर्यंत किंवा त्यांत फेरबदल करण्यात येईपर्यंत संबंधित विद्यापीठाच्या बाबतीत त्या विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने ते केले असल्याचे समजण्यात येईल ;

(चौदा) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने, विद्या परिषदेने किंवा विद्या शाखेने किंवा इतर प्राधिकरणाने केलेले सर्व विनियम, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील तेथवर अंमलात राहतील आणि ते या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विनियमाद्वारे त्यांचे अधिक्रमण करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईतोवर यथास्थिती, संबंधित विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने, विद्या परिषदेने, विद्या शाखेने किंवा इतर प्राधिकरणाने, या अधिनियमान्वये केले असल्याचे समजण्यात येईल ;

(पंधरा) या कलमाद्वारे निष्प्रभावित करण्यात आलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिकरणाने काढलेल्या किंवा जारी केलेल्या सर्व नोटिसा व आदेश हे, या अधिनियमाच्या उपबंधांशी जेथवर विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहील व या अधिनियमान्वये त्यांचे अधिक्रमण किंवा त्यात फेरबदल करण्यात येईतोपर्यंत, ते संबंधित प्राधिकरणाने केले असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, या कलमान्वये रद्द करण्यात आलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये करण्यात आलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले कोणतेही परिनियम, विनियम, नियम, नोटिसा किंवा आदेश हे, या अधिनियमान्वये असे परिनियम, विनियम, नियम, नोटिसा किंवा आदेश काढण्याचा अधिकार हा निराळ्या प्राधिकाऱ्यांकडे किंवा संस्थेकडे किंवा अधिकाऱ्यांकडे निहित आहे किंवा त्याचा विषय हा विधिविधानाच्या निराळ्या स्वरूपात किंवा या अधिनियमाखाली करावयाच्या लेखाखालीच केवळ अनुज्ञेय आहे याच केवळ कारणावरून, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत असल्याचे समजण्यात येणार नाही.

७१. या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यात कोणतीही अडचणी उद्भवल्यास, राज्य शासनास, परिस्थितीनुरूप, परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षांनंतरचा असणार नाही अशा कालावधीमध्ये, अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाची उद्दिष्टे व प्रयोजने यांच्याशी विसंगत नसणारी, कोणतीही गोष्ट, आदेशान्वये, करता येईल. अडचणी दूर करणे.

*

## अनुसूची

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि महाविद्यापीठ

[ कलमे २ (ड), २ (फ) व ३ (आय) पहा. ]

| | विद्यमान विद्यापीठ | या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या संबंधित विद्यापीठाचे नाव | विद्यापीठाचे क्षेत्र | संबंधित विद्यापीठाचे मुख्यालय |
|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) |
| १ | महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७. (१९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३) याअन्वये रचना करण्यात आलेले महात्मा फुले कृषि विद्यापीठ. | महात्मा फुले .. कृषि विद्यापीठ | पुणे व नाशिकचा महसुली विभाग समाविष्ट असलेले क्षेत्र. | राहुरी. |
| २. | डॉ. पंजाबराव कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६८. (१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९) याअन्वये रचना करण्यात आलेले पंजाबराव कृषि विद्यापीठ. | पंजाबराव .. कृषि विद्यापीठ | नागपूर व अमरावतीचा महसुली विभाग समाविष्ट असलेले क्षेत्र. | अकोला. |
| ३. | मराठवाडा कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२. (१९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७) याअन्वये रचना करण्यात आलेले मराठवाडा कृषि विद्यापीठ. | मराठवाडा .. कृषि विद्यापीठ | औरंगाबाद महसुली विभागाचा महसुली विभाग समाविष्ट असलेले क्षेत्र. | परभणी. |
| ४. | डॉ. कोकण कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२. (१९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८) याअन्वये रचना करण्यात आलेले कोकण कृषि विद्यापीठ. | कोकण .. कृषि विद्यापीठ | मुंबई व कोकणचा महसुली विभाग समाविष्ट असलेले क्षेत्र. | दापोली. |

** डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

* १९९५चा १९ च्या कलम २ अन्वये वरील मजकूर समाविष्ट करण्यात आला.

** २००० चा ४८ च्या कलम २ अन्वये वरील मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

१९७५ चा महा. ४.